# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

## दिनांक १८.०५.२०११ रोजी संपन्न झालेल्या सर्व सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिंनाक १८.०५.२०११ रोजी (का.प.क्र.२०)मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.४.२५ वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
२. स.स.श्री.शिंदे राजु रामराव
३. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
४. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
७. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
८. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
९. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
१०. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
११. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
१२. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१३. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१४. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१५. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१६. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
१७. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१८. स.स.सौ.उर्मिला नितीन चित्ते
१९. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२०. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२१. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२२. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२३. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
२४. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
२५. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान

२६. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
२७. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
२८. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
२९. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३०. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
३१. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
३२. स.स.श्री.मोहम्मद मुजीबउद्दीन कदिरोद्दीन
३३. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
३४. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
३५. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
३६. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
३७. स.स.डॉ.खान जफर अहेमद
३८. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
३९. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
४०. स.स.श्री.खान आगा मिया खान
४१. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
४२. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
४३. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
४४. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत
४५. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
४६. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
४७. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
४८. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान
४९. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
५०. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
५१. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
५२. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
५३. स.स.श्री.जोशी संजय रामदास
५४. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
५५. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
५६. स.स.श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर
५७. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
५८. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
५९. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश
६०. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव
०२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
०३. स.स.श्रीमती पाटील रेखा दिनकरराव

**चर्चा :**

श्री.मीर हिदायत अली:समांतर जलवाहिनी संदर्भात विशेष सभा आयोजित करण्यात येईल असे आपण मागिल बैठकीत म्हटले स्थायी समितीचे ४ सदस्यांनी सुध्दा लेखी पत्र दिले सभा केंव्हा आयोजित करणार आहात.

श्री.प्रमोद राठोड :समांतर जलवाहिनी संदर्भात सभा आयोजित करण्या विषयी ३ बैठकीपासून विनंती करतो सभेचे आयोजन होईल असे आपण म्हटले होते स्थायी समितीच्या ४ सदस्यानीही लेखी मागणी केली त्या सभेत सदस्यांना अटी शर्तीची माहिती देणार व सदस्यांना मत मांडता येईल खुलासा दिला जाईल त्यानंतर पुढील कार्यवाही होणार होती परंतु अदयाप सभा आयोजित केली नाही.

मा.महापौर :लवकरच विशेष सभा लावण्यात येईल तारिख निश्चित केली नांही समांतर जलवाहिनी विषयी १५ दिवसाच्या आत सभा आयोजित केली जाईल.

**विषय क्र.३०५:**

दिनांक २०.१२.२०१० व १८.०१.२०११ (का.प.क्र.१२ दि.२०.१२.२०१० ची तहकूब), सर्वसाधारण सभा व ०४.०१.२०११ रोजीचे विशेष सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव :**

दिनांक २०.१२.२०१० व १८.०१.२०११ (का.प.क्र.१२ दि.२०.१२.२०१० ची तहकूब), सर्वसाधारण सभा व ०४.०१.२०११ रोजीचे विशेष सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यास मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ३०६:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे शासन आदेश क्र.बदली-१०.०८/प्र.क्र.२२/२००८/कोषा.(प्र.२). दि.३१/५/२००८ नुसार श्री.वि.सो.जाधव,सहाय्यक संचालक (प्रशिक्षण), उपसंचालक लेखा कोषागारे, औरंगाबाद यांची मुख्य लेखा परिक्षक, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रशासकीय कारणास्तव प्रतिनियुक्तीच्या विहित अटी व शर्तीनुसार नेमणूक करण्यांत आली आहे.

त्यानुषंगाने दि.२/८/२००७ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.२६३ अन्वये श्री.वि.सो.जाधव, यांची रुजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.५/६/२००८ रोजी मध्यान्हपूर्व मुख्य लेखा परिक्षक, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रथम एक वर्षाकरीता प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती-नुसार प्रतिनियुक्तीस मान्यता दिलेली असून,त्याची मुदत दि.४/६/२००९ रोजी संपली होती. तथापी महापालिकेस त्यांच्या कामाची आवश्यक असल्याने दि.२४/८/२००९रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.५९८ अन्वये त्यांना दि.५/६/२००९ पासून पुढील एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार मुदतवाढ देण्यांत आली. सदरील मुदत दि.४/६/२०१० रोजी संपलेली आहे.

तथापी महापालिकेस त्यांच्या कामाची आवश्यक असल्याने त्यांना दि.५/६/२०१० पासून पुढील एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री.राजू शिंदे :शासनाकडील अधिकारी यांना मुदतवाढ देण्याचे प्रस्ताव आले आवश्यकता आहे असे प्रशासनाच्या वतीने म्हटले ज्यानी काम केले नाही चुकीचे काम केले,महापालिकेचे नुकसान केले अशा ही अधिका-यांना मुदतवाढ देणार का ज्यांनी चांगले काम केले फायदा केला त्यांची शिफारस केली असती तर हरकत नाही.

श्री.त्रिंबक तुपे :अधिका-यांना मुदतवाढ देण्या विषयी अनेक प्रस्ताव आहे एकत्रित चर्चा न करता.१-१ विषय चर्चेला घ्यावेत. २०६ वर चर्चा व्हावी

श्री.राजू शिंदे :ज्यांनी चांगले काम केले तसा खुलासा व्हावा ज्यांचेकडून चुका झाल्या कोणत्या स्वरूपाच्या झाल्या,महापालिकेचे नुकसान झाले का सर्व माहिती समोर यावी.ज्यांचेमुळे महापालिकेचा फायदा आहे त्यांनांच ठेवावे

श्री.त्रिंबक तुपे :या प्रस्तावानुसार यांचे बदली संदर्भात शासनाकडून पत्र आले का ? अधिकारी यांनी केलेले काम यावरही चर्चा करणे गरजेचे आहे.काही अधिकारी यांनी चांगली कामे केली त्यांचा मान सन्मान करणे गरजेचे आहे

मुख्य लेखा परीक्षक :माझे बदलीचे आदेश १३ तारखेलाच पारीत झाले प्रत्यक्ष मला मिळाले नाही इंटरनेंटवर माहिती मिळाली सहा.संचालक लेखा व कोषागार औरंगाबाद येथे माझी बदली झाली आहे.

श्री.त्रिंबक तुपे :श्री. जाधव साहेब यांनी त्यांचे कार्यकाळत येथे चांगल्या प्रकारे काम केले जी जबाबदारी त्यांना दिली ऑडीट असेल चौकशी असेल ते काम त्यांनी चांगल्या रितीने पार पाडले एक चांगले अधिकारी म्हणून सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो.

श्री.काशिनाथ कोकाटे :मुख्य लेखा परीक्षक या पदावर श्री.विलास जाधव यांनी ३ वर्षाचा कालावधी पुर्ण केला.मुख्यलेखाधिकारी म्हणून काम केले.त्यांनी जबाबदारीने व वेळेवर लेखा परीक्षणाचा अहवाल दिले ज्या त्रृटी असतील काढल्या कोणाच्याही दबावाला बळी न पडता इमाने इतबारे तसेच नियमाला अधिन राहून काम केले पदाचा अवमान होईल असे काम केले नाही.अनेक चौकशा केल्या ते अहवाल दिले त्यावर शंका व अक्षेप घेण्या इतपत त्रृटी नव्हत्या.चांगले काम केले आता पदोन्नती झाली अभिनंदन करण्या बाबत माझे अनुमोदन आहे.त्यांनी केलेल्या कामाचा निश्चित इतर कर्मचारी अधिकारी यांनी बोध घेतला पाहिजे.

श्री.संजय चौधरी :श्री. जाधव साहेब यांचे अभिनंदन केले.चांगले काम त्यांनी केले अभिनंदनास ते पात्र आहे सभागृहाच्या वतीने मी अभिनंदन करतो जे चौकशीचे काम त्यांना दिले त्यांनी निपक्षपातीपणे चौकशी केली. कोणत्याही पदाधिकारी, अधिकारी यांचा चौकशीवर अक्षेप नाही. ज्या चौकशा प्रलंबीत आहे त्या पुर्ण केल्या तर निश्चित महापालिकेचे त्यात हित साधले जाईल.

मा.महापौर :श्री.वि.सो.जाधव,मुख्य लेखापरिक्षक हे एक जबाबदार व कर्तव्यदक्ष अधिकारी आहे त्यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येते. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.वि.सो.जाधव,सहाय्यक संचालक (प्रशिक्षण), उपसंचालक लेखा कोषागारे, औरंगाबाद यांची मुख्य लेखा परिक्षक, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर दि.५/६/२०१० पासून पुढील एक वर्षा करीता प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच सभागृहात झालेल्या चर्चे प्रमाणे श्री. वि.सो.जाधव हे कर्तव्यदक्ष अधिकारी असून त्यांनी अत्यंत चांगली कामे केल्याने सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०७:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो, महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे निर्णयाच्या कार्यालयीन आदेश क्र.पदस्थापना-१३०८/प्र.क्र.१०१/०८/सेवा-२, मंत्रालय, मुंबई-३२ नुसार डॉ.एस.जी.देवगांवकर, बधिरीकरण तज्ञ, सा.रु.नाशिक यांना उपसंचालक पदी श्रेणी अवनत करुन यांची ''वैद्यकीय अधिकारी'' औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद या पदावर पदस्थापना करण्यांत

आली आहे.

त्यानुषंगाने दि.१७/५/२००८ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.२३२ अन्वये डॉ.एस.जी.देवगांवकर, यांची रूजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.७/४/२००८ रोजी मध्यान्हपूर्व आरोग्य वैद्यकीय अधिकारी,महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रथम एक वर्षाकरीता प्रति-नयुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता दिलेली असून,त्याची मुदत दि.६/४/२००९ रोजी संपली होती. तथापी महापालिकेस त्यांच्या कामाची आवश्यक असल्याने दि.२१/१२/२००९ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.७९२ अन्वये दि.७/४/२००९ पासून पुढील एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार मुदतवाढ देण्यांत आली. सदरील मुदत दि.६/४/२०१० रोजी संपलेली आहे.

तथापी महापालिकेस त्यांच्याकामाची आवश्यक असल्याने त्यांना दि.७/४/२०१० पासून पुढील एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

<u>ठराव</u>:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.एस.जी.देवगांवकर, यांना उपसंचालक पदी श्रेणी अवनत करुन त्यांची औरंगाबाद महानगरपालिकेत ''आरोग्य वैद्यकीय अधिकारी'' महानगरपालिका, औरंगाबाद या पदावर दि.०७/०४/२०१० पासून पुढील एक वर्षा करीता झालेल्या प्रतिनियुक्तीस प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यांत येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र.३०८</u>:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे शासन आदेश क्र.एमसीओ-१२०९/प्र.क्र.८०/०९/नवि-१४. दि.३१/७/२००९ अन्वये श्री.अजय चारठाणकर, उपआयुक्त, नांदेड-वाघाळा महानगरपालिका यांची ''कर मुल्य निर्धारक व संकलक'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर बदलीने पदस्थापना करण्यांत आली आहे.

त्यानुषंगाने दि.२१/१२/२००९ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.७८९ अन्वये श्री.अजय चारठाणकर, यांना रुजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.६/८/२००९ रोजी मध्यान्हापूर्व करमुल्य निर्धारक व संकलक, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रथम एक वर्षाकरिता प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता दिलेली आहे. सदरील मुदत दि.५/८/२०१० रोजी संपत आहे.

तथापी महापालिकेस त्यांच्या कामाची आवश्यक असल्याने त्यांना दि.६/८/२०१० पासून पुढील एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

<u>ठराव</u>:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.अजय चारठाणकर, उपआयुक्त, नांदेड-वाघाळा महानगरपालिका यांची ''कर मुल्य निर्धारक व संकलक'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीस अधिन राहून दि.६/८/२०१० पासून पुढील एक वर्षा करीता प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेस मंजुरी देण्यांत येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र.३०९</u>:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे शासन आदेश क्र.एमसीओ-१२०९/प्र.क्र.१४६/नवि-१४.दि.७/७/२०१० अन्वये श्री.संतोष महादेव खांडेकर, मुख्याधिकरी गट (अ) संवर्गात ''उपआयुक्त'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर नव्याने पदस्थापना करण्यांत आली आहे.

करिता श्री.संतोष महादेव खांडेकर, यांना रुजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.२३/७/२०१० रोजी मध्यान्हापूर्व ''उपआयुक्त'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर प्रथमतः एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे शासन आदेश क्र.एमसीओ-१२०९/प्र.क्र.१४६/नवि-१४.दि.७/७/२०१० अन्वये श्री.संतोष महादेव खांडेकर, मुख्याधिकारी गट (अ) संवर्गात ''उपआयुक्त'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर दि.२३/०७/२०१० पासून प्रथमतः एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीस अधिन राहून त्यांच्या प्रतिनियुक्तीस मान्यता देण्यांत येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१०:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन आदेश क्र.एमसीओ-१२१०/प्र.क्र.११८/नवि-१४,मंत्रालय,मुंबई. दि.२७/८/२०१० अन्वये श्री.श्रीकृष्ण भालसिंग, मुख्याधिकारी, श्रेणी-१, नगरपरिषद, बीड यांची ''उपआयुक्त'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर बदली करण्यात आलेली आहे.

करिता श्री.श्रीकृष्ण भालसिंग,यांना रुजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.२६/११/२०१० रोजी मध्यान्हापूर्व ''उपआयुक्त'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर प्रथमतः एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद:**

श्री.त्रिंबक तुपे :श्री.श्रीकृष्ण भालसिंग उपआयुक्त पदावर रूजू केंव्हा झाले व रजेवर कधी गेले माहित नाही.तरी सुध्दा पुर्ण पगार त्यांनी घेतलेला आहे. संबधीत अधिकारी यांना परत पाठविण्यात यावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :संबधीत अधिकारी यांनी कोणत्या विभागात व किती दिवस काम केले याचे ऑडीट होण्याची गरज आहे.नियुक्ती झाली रूजू झाले कोणत्या विभागात काय काम केले ,नसेल केले तर केले नाही हे संबधीत शासनाच्या विभागास कळविले पाहिजे.माझ्या माहिती प्रमाणे संबधीत अधिकारी यांनी महापालिकेत काम केलेले नाही.त्यांचा पगार दिला का याचा खुलासा घ्यावा.

मा.महापौर :विषय क्रमांक ३१० श्री.श्रीकृष्ण भालसिंग, उपआयुक्त यांना परत पाठविण्यात येत आहे. सभागृहाच्या वतीने मा.आयुक्त यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी मुख्य कार्यालयास कळविले पाहिजे की, श्री.श्रीकृष्ण भालसिंग यांनी फक्त कार्यभार स्विकारला व रजेवर गेले एक वर्षापासून नुसता त्यांनी पगारच उचललेला आहे असा शेरा लिहुन कार्यालयाकडे कळवावे.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन आदेश क्र.एमसीओ-१२१०/प्र.क्र.११८/नवि-१४,मंत्रालय,मुंबई. दि.२७/८/२०१० अन्वये श्री.श्रीकृष्ण भालसिंग, मुख्याधिकारी, श्रेणी-१, नगरपरिषद, बीड यांची ''उपआयुक्त'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर बदली करण्यात आली त्यानुसार श्री.श्रीकृष्ण भालसिंग,यांना रुजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.२६/११/२०१० रोजी मध्यान्हापूर्व ''उपआयुक्त'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर प्रथमतः एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबतच्या प्रस्ताव नामंजुर करण्यात येतो तसेच संबधीत अधिकारी यांनी येथे रूजु होऊन रजेवर निघुन गेले आहे असे संबधीत विभागास कळविण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३११:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो, महाराष्ट्र शासन कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांचे आदेश क्र.पसंप्र-११०८/प्र.क्र.१५०/०८/पदुम-१ दि.३१.०५.२००८ अन्वये डॉ.बी.एस.नाईकवाडे, पशुधन विकास अधिकारी, पशुवधगृह, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, औरंगाबाद यांची मुख्य पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यापदावर प्रतिनियुक्तीच्या विहीत अटी व शर्तीनुसार नेमणूक करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने दि. २०.०८.२००८ (दि.१९-२९.०७.२००८ ची तहबकू) रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.२६४ अन्वये डॉ.बी.एस.नाईकवाडे, यांची रुजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि. १०.०६.२००८ रोजी मध्यान्हापूर्व मुख्य पशूसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रथम एक वर्षाकरिता प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता दिलेली आहे. तथापी त्यांची मुदत दि. ०९.०६.२००९ रोजी संपलेली आहे.

तथापी या महापालिकेस त्यांच्या कामाची आवश्यक असल्याने त्यांना दिनांक १०.०६.२००९ पासून पुढील दोन वर्षासाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री.विजेंद्र जाधव :डॉ. बी.एस नाईकवाडे यांना महापालिकेत येवून ३ वर्ष झाले डेप्युटेशन वरील अधिकारी यांना ३ वर्षापेक्षा जास्त कार्यकाळ एकाच ठिकाणी ठेवता येत नाही.त्यांचेमुळे महापालिकेचा कोणताही फायदा झाला नाही. गेल्या एक वर्षात प्रांणीसंग्रहालयातील १४ जनावरे दगावली त्यांना खाद्य देण्याकडे दुर्लक्ष झाले तसेच संबधीत अधिकारी यांचे वसुलीकडेही दुर्लक्ष झालेले आहे त्यांना परत पाठविण्यात यावे.

सौ.किर्ती शिंदे :माझ्या वार्डात सकाळच्या वेळी मोकाट कुत्रे फिरतात शालेय विद्यार्थ्यांना त्यांचा त्रास होतो.चावण्याची भिती संबधीत अधिकारी श्री.नाईकवाडे यांना वारंवार दुरध्वनीवररून संपर्क केला असता ती मोकाट कुत्रे पकडण्याची कार्यवाही केली सदस्यांचे ते ऐकत नाही त्यांना परत पाठविण्यात यावे.

श्री.किशोर नागरे :पशुधन अधिकारी यांचेकडे सध्या २-३ प्रोजेक्ट चांगले आहे सफारी पार्ककरीता १०० एकर जागा मिळवून देण्यासाठी त्यांचा मोठा प्रयत्न आहे.तसेच केंद्र शासनाच्या ज्या योजना आहे त्या त्यांनी मंजूर करून आणल्या मच्छी मार्केट साठी ९० टक्के सबसिडीचा प्रोजेक्टसाठी त्यांचे प्रयत्न आहे भविष्यात तो उपयोगी पडेल.या व्यतिरीक्त ३-४ प्रोजेक्ट त्यांचेकडे आहे महापालिकेत त्यांची गरज आहे हा प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही.मी त्यांचे बरोबर मुंबईला गेलो होतो. विविध योजनासाठी त्यांनी पाठपुरावा केला आहे. ते अभिनंदनास्पद आहे.

श्री.कृष्णा बनकर :श्री. नाईकवाडे यांना या ठिकाणी ३ वर्ष पुर्ण झाले त्यांचे जागेवर जे अधिकारी येतील ते या योजनाचे काम करतील निष्क्रीय अधिकारी आहे फोन केला तर उचलत नाही. माझ्या वार्डातही अनेक मोकाट कुत्रे,डुक्कर फिरत असतात संबधीत अधिकारी यांना परत पाठवावे.

श्री.त्रिंबक तुपे :वेगवेगळी मते असू शकतात संबधीत अधिकारी यांचे कार्यकाळात.फिश मार्केट विविध अनुदान प्राप्त करणे सफारी पार्क योजना असेल हे राबविण्यासाठी त्यांची या शहराला गरज आहे. महापालिकेच्या हिताचे निर्णय त्यांचे कार्यकाळात झाले यापूढे त्यांचेकडून चांगले काम करण्याचे आदेशीत करावे प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.काशिनाथ कोकाटे:प्रांणी संग्रहालयामध्ये पशुसंवर्धन व दुग्ध विकास व्यवसाय, मत्स व्यवसाय विभाग यांचे माध्यमाने केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना होत्या त्याचे अनुदान मिळविण्यासाठी प्रयत्न केले फिश मार्केट साठी त्यांनी केंद्र शासनाकडून निधी मिळविण्यासाठी पुढाकार घेवून जी जबाबदारी दिली होती ती त्यासाठी प्रयत्न केला.स.सदस्याच्या ज्या तक्रारी आहे त्या सोडवण्यासाठी त्यांना आदेशीत करावे व त्यांना पुढील काळासाठी मुदतवाढ देण्यात यावी.

मा.महापौर :हा विषय मंजूर करण्यात येतो श्री.नाईकवाडे यांनी सिल्लेखाना येथील कार्यवाही समाधान कारक केली आहे. फिश मार्केट केंद्र शासनाकडून निधी

मिळविण्या करीता त्यांनी प्रयत्न केला. प्राण्यांनसाठी पॅथॉलॉजी लॅबचे काम सुरु आहे. मोकाट कुत्र्यांविषयी स.सदस्यांचे तक्रारी आहे या बाबत तातडीने कुत्रे पकडण्याची मोहिम हाती घ्यावी. कोणत्या वार्डात किती कुत्रे पकडे व कुठे सोडले याची माहिती सादर करावी.

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.बी.एस.नाईकवाडे, पशुधन विकास अधिकारी, पशुवधगृह, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, औरंगाबाद यांची मुख्य पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यापदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक १०/०६/२००९ पासून पुढील दोन वर्षा करीता प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेस मंजुरी देण्यांत येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३१२:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो, महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे शासन आदेश क्र.बदली-१००९/प्र.क्र.१११/कोषा.प्र-२.दि.३०/५/२००९अन्वये श्री.यु.जी.चव्हाण, वरिष्ठ लेखाधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांची ''मुख्य लेखाधिकारी'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर बदलीने पदस्थापना करण्यांत आली आहे.

त्यानुषंगाने दि.२१/१२/२००९ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.७८८ अन्वये श्री.यु.जी.चव्हाण, यांना रुजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.२/६/२००९ रोजी मध्यान्हानंतर मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रथम एक वर्षाकरिता प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता दिलेली असून सदरील मुदत दि.१/६/२०१० रोजी संपलेली आहे.

तथापी महापालिकेस त्यांच्या कामाची आवश्यकअसल्याने त्यांना दि.२/६/२०१० पासून पुढील एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार मुदतवाढदेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री.राजू शिंदे :ज्या अधिका-यांनी चांगले काम केले त्यांचे सभागृहाने अभिनंदन केले. काहीच्या तक्रारी होत्या त्यांनी कामात सुधारणा करावी म्हणून वेळ दिला मुदतवाढ दिली.या प्रस्तावानुसार मुख्यलेखाधिकारी यांना मुदतवाढ दयायची त्यांचेमुळे महापालिकेला कोणकोणत्या अडचणी आल्या याचा खुलासा होणे आवश्यक आहे.महापालिकेच्या बँक खात्यावर रक्कम शिल्लक नसतांना मुख्यलेखाधिकारी यांनी एमएसईबी ला धनादेश क्र.१४८०३१ दिनांक २७-१०-२०१० ला रूपये २,१८,२९०९४/-चा धनादेश दिला तो धनादेश वटवला गेला नाही परत आला या बाबतीत मा. आयुक्तांनी संबधीत अधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करायला पाहिजे होती ती केली नाही. दुसरा मुद्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम ज्या त्याच महिण्यात जमा केली पाहिजे परंतु तसे होत नाही २-३ महिण्याची रक्कम एकाच वेळी जमा होते विलंब झाल्यामूळे नियमाचे भंग झालेला आहे मुख्यलेखाधिकारी यांचेवर प्रशासकीय कार्यवाही होणे अपेक्षीत होते ती झाली नाही.बँक खात्यावर पुरेशी रक्कम नसतांना ७-८ कोटीचे धनादेश दिले ते वटवले गेले नाही.१००/-रू जमा असेल तर ९०/-रू धनादेश देवू शकतो यात सुध्दा नियोजनाचा अभाव आहे.जमा व खर्च बाजू याचे नियोजन करण्याची जबाबदारी मुख्यलेखाधिकारी यांची असते परंतु कोणतेही नियंत्रण नसल्याचे लक्षात येते.माहे डिसे. जानेवारी २०११ मध्ये मुख्यलेखा परीक्षक यांनी सुध्दा मुख्यलेखाधिकारी यांचे कारभारा विषयी अक्षेप नोंदविला त्यांनी कॅश बुकवर खाडाखोड केली असे असतांना मुदवाढीचा ठराव ठेवला.त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करणे अपेक्षीत होते.तसेच तातडीचे कामे वगळता इतर किरकोळ कामासाठी शिल्लक नसतांना बीपीएमसी ॲक्ट नुसार त्यासाठी शिफारस करता येत नाही परंतु आर्थीक तरतुद नसतांना शिफारस केली आहे.याचा कोठेही ताळमेळ लागत नाही.२ वर्षात जी आर्थीक परीस्थिती महापालिकेची कोलमंडली

त्यास मुख्यलेखाधिकारी जबाबदार आहे.तसेच सन २००९-१० मध्ये सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मागासवर्गीय विदयार्थ्यांना मोफत दप्तर वाटपामध्ये शासनाचे निर्देश असतांना प्रस्ताव देवून बीपीएमसी ॲक्ट नुसार ५-२-२ प्रमाणे कार्यवाही केली.अधिका-यांच्या चुकीच्या अभिप्राय येत असल्याने ५-२-२ नुसार ७-८ कोटीची कामे करण्यात आली मा.आयुक्तांची यात दिशाभूल करण्यात आली वाजवीपेक्षा जास्त खर्च झाला त्यामूळे मागिल दोन वर्षात महापालिकेची आर्थीक परीस्थिती डबघाईला आली.५-२-२ नुसार कामाचे टेंडर होते. समान टेंडर आले मा.आयुक्तांनी स्थायी समितीला ते काम करण्याची शिफारस करायला पाहिजे.तर ते काम करता येते.जे दर आले त्यापेक्षा जास्त दराने कामे ५-२-२ मध्ये दिली गेली त्यामूळे आर्थीक नुकसान झाले अशा वेळी त्यावर मुख्यलेखाधिकारी यांनी कुठेही नुकसान होत असल्याचे नमुद केले नाही. ६७(३)(क) नुसार काही प्रमाणात कामे करता येतात परंतु कामे चुकीचा अर्थ लावून केली जात आहे. ऑक्टोंबर २०१०-११ ला बँक खर्चाचे क्रेडीट ताळे तपासले तर महापालिका बँक खाते दररोज ८-१० कोटीने वजा आहे.१ ोटी असेल तर ५ कोटीने वजा कसे ठेवतो.अशा प्रकारची अनियमितता होत असेल तर त्यास कोण जबाबदार शिस्तभंगाची व इतर कार्यवाही करणे बाबत शिफारस होणे अपेक्षीत होते परंतु झाली नाही.विकास शुल्क भरण्या संबधी मुदतवाढ दिली १.७५ कोटीचे नुकसान झाले मुख्यलेखाधिकारी यांचेकडे तपासण्यासाठी पाठविले असता मधल्या काळात परवानगीसाठी कोणी आल्यास महापालिकेचे यामूळे आर्थीक नुकसान होवू शकते किंवा सर्वसाधारण सभा किंवा स्थायी समितीमध्ये हा विषय यायला पाहिजे असा अभिप्राय देण्या ऐवजी त्यानी २०-१-२०११ पर्यत मुदतवाढ देण्यास हरकत नाही असे दिले.असा अभिप्राय देण्याचा अधिकार मुख्यलेखाधिकारी यांना आहे का अशा अधिका-यांना महापालिकेत जास्त कार्यकाळ सेवेत ठेवणे तर आणखी आर्थीक परीस्थितीला सामोरे जावे लागेल.त्यासाठी अशा अधिका-यांना त्यांचे मुळ खात्यात परत पाठवावे त्यांना मुदतवाढ देवू नये.

श्री.त्रिंबक तुपे :स.सभापती यांनी अधिकारी कसे काम करतात व महापालिकेच्या हिताची माहिती दिली असे ठराव वेळेच्या आत यायला पाहिजे यात जी मुदत दयायची ती १५ दिवसा नंतर संपणार आहे.त्यापूढे सेवा घ्यायची असेल तर पुन्हा प्रस्ताव समोर आणावा लागेल.अधिका-याकडून काम करून घेण्यात आपलाही सहभाग असतो.पदाधिकारीही काही कामे करून घेण्याचा प्रयन करतात अधिका-यांनी काम करायचे कळत न कळत चुका त्यांचेकडून होतात व त्यांनी केलेले कार्य विसरून जायचे हे योग्य वाटत नाही. श्री. चव्हाण यांचे कार्यकाळात महापालिकेची आर्थीक परीस्थिती बिकट होती त्यांनी चांगले काम केले असे माझे मत आहे.कुणावरही अन्याय व्हायला नको अधिका-यांना त्याची बाजू मांडण्याची संधी दिली पाहिजे परीस्थिती बिकट असतांना काही योजनाच्या बाबतीत अधिकारी चांगले काम करीत आहे.श्री.चव्हाण हे चांगले काम करीत आहे ठराव मंजूर करावा.

श्री.राजू शिंदे :ज्यांनी चांगले कामकेले त्यांचे अभिनंदन केले.एखादा सदस्य अधिका-यांनी चांगले काम केले नाही महापालिकेचे नुकसान झाले माहिती देत असेल तर काही प्रमाणात सत्य असेल.मुख्य लेखा परीक्षक यांनी मुख्यलेखाधिकारी यांचे कामाबध्दल अभिप्राय दिला अक्षेप नोंदविला असतांना त्यांना मुदतवाढ देवून

सेवेत ठेवणार असेल तर योग्य वाटत नाही.यात योग्य निर्णय अपेक्षीत आहे ठराव मंजूर करण्याला माझा विरोध आहे त्यांना परत पाठवावे.

श्री.गिरजाराम हळनोर: काही बाबतीत नियमबाहय झाले असेल.अधिका-याला पत्र देवून कोणाचे पेमेंन्ट दयाचे , थांबवायचे हे सांगण्याचा अधिकार आहे का ते काम करून घेतले ते नियमानुसार होते का हे सुध्दा बघावे चांगले काम केले असेल तर त्याकडे दुर्लक्ष होवू नये प्रस्तावानुसार त्यांची मुदत २-६-२०११ संपणार आहे वाद वाढवू नये प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.राजू शिंदे :आमचे अधिकार काय आहे माहित आहे.मोठया ठेकेदाराची बिले दिली जात असे कमी रक्कमेची बिले न दिल्यामूळे ठेकेदार महापालिकेत चकरा मारत असे मी जातीने लक्ष देवून त्या कार्यकाळात वसुलीवर भर दिला व भेदभाव न करता सर्वांनाच पेमेन्ट दिले जावे म्हणून प्रयत्न केला

श्री.गिरजाराम हळनोर:विषय मंजूर करावा.

श्री.राजू शिंदे :मंजूर करू नये त्यांना परत पाठवावे.मुख्य लेखा परीक्षक यांचा त्यांचे कामा विषयी अक्षेप आहे.

मा.उपमहापौर :स.सभापती यांची चांगली माहिती सभागृहात दिली.धनादेश वटवले गेले नाही वसुली झाली नाही.एएमटीच्या बँक खात्या संदर्भात ज्या चुका झाल्या व त्यामूळे बस सेवा एसटीमहामंडळाकडे दयावी लागली त्या बसेस भंगार मध्ये विकण्याची जी वेळ आली २ कोटी रक्कम महापालिकेस देण्याची वेळ आली.बँक खाते ट्रान्सफर झाले नसते तर महापालिकेच्या वतीनेच बस सेवा शहरात असती.तसेच मतदाराच्या संख्येनुसार निवडणुकीचा खर्च व्हावा असे निर्देश असतांना सुध्दा जास्त खर्च केला त्यामूळे मा.आयुक्तांना निवडणूक आयोगाकडून नोटीस आली स.सभापती व मी जे मुद्दे मांडले त्याची चौकशी व्हावी सभागृहा समोर यावे. १५ दिवसापर्यतच या प्रस्तावानुसार त्यांची मुदत आहे. पुढील मुदतवाढीच्या वेळेस जे मुद्दे मांडले त्याची चौकशी होवून तो अहवाल व प्रस्ताव यावा. सत्य प्रीस्थिती सभागृहाला कळेल.

श्री.त्रिंबक तुपे :जे मुद्दे येथे मांडले त्याची चौकशी व्हावी परंतु हा विषय मंजूर करावा.

श्री.प्रमोद राठोड :असे प्रस्ताव ठेवत असतांना त्या अधिका-यांचे कामाचे मुल्यमापन व्हावे कोणती चौकशी चालू आहे महापालिकेचा त्यांनी काय फायदा केला नुकसान कीती केले त्याची माहिती सभागृहासमोर आली पाहिजे.सेवेत कोणास ठेवायचे किंवा परत पाठवायचे हे आमचे काम नाही जनतेच्या कामासाठी आलेलो आहेत.मुल्यमापनासह माहिती यावी निर्णय घेणे सोयीस्कर होईल.

श्री.राजू शिंदे :संबधीत अधिकारी यांना परत पाठवावे.

मा.महापौर :विषय क्र. ३१२ मंजूर करण्यात येतो.महापौर या नात्याने मीही त्यांचे कामावर नाराज आहे. त्यांना सुधारणा होण्याची एक संधी देण्यात येते.त्यांचे कामात ज्या तृटी आहे त्याचा अहवाल घेवून त्यांचे कामात सुधारणा होण्याकडे लक्ष दिले जाईल.

या वेळी स.श्री.राजू शिंदे व श्री. कृष्णा बनकर हे डायसवरील राजदंड ओढण्याचा प्रयत्न करतात.इतर ही सदस्य डायस समोर जमा होतात.

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.यु.जी.चव्हाण, वरिष्ठ लेखाधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांची ''मुख्य लेखाधिकारी'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर दि.०२/०६/२०१० पासून प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीस अधिन राहून पुढील एक वर्षा करीता प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेस मंजुरी देण्यांत येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३१३</u>:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो, महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे शासन आदेश क्र.एमसीओ-१२१०/प्र.क्र.१२९/१०/नवि-१४,मंत्रालय,मुंबई.दि.७/१०/२०१० अन्वये श्रीमती. सपना वसावा मुख्याधिकारी गट-ब, नगर परिषद यावल जि.जळगांव, यांची ''सहाय्यक आयुक्त'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर बदली करण्यात आलेली आहे.

करिता श्रीमती.सपना वसावा, यांना रुजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.११/११/२०१० रोजी मध्यान्हानंतर ''सहाय्यक आयुक्त'' औरंगाबाद महानगर पालिका या पदावर प्रथमतः एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :श्रीमती सपना वसावा यांना परत पाठविण्यात येत आहे.

**<u>ठराव</u>:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे शासन आदेश क्र.एमसीओ-१२१०/प्र.क्र.१२९/१०/नवि-१४,मंत्रालय,मुंबई. दि.७/१०/२०१० अन्वये श्रीमती.सपना वसावा मुख्याधिकारी गट-ब, नगर परिषद यावल जि.जळगांव, यांची ''सहाय्यक आयुक्त'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३१४</u>:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो, महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे शासन आदेश क्र.एमसीओ-१२१०/प्र.क्र.८०/नवि-१४, मंत्रालय, मुंबई. दि.१३/८/२०१० अन्वये कु.शुभांगी आंधळे, मुख्याधिकारी, नगर परिषद, देऊळगांवराजा, जि.बुलढाणा यांची ''सहाय्यक आयुक्त'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर बदली करण्यात आलेली आहे.

करिता कु.शुभांगी आंधळे, यांना रुजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.२६/८/२०१० रोजी मध्यान्हापूर्व ''सहाय्यक आयुक्त'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर प्रथमतः एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :कु. शुभांगी आधंळे यांना सुध्दा परत पाठविण्यात येत आहे.

**<u>ठराव</u>:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे शासन आदेश क्र.एमसीओ-१२१०/प्र.क्र.८०/नवि-१४, मंत्रालय, मुंबई. दि.१३/८/२०१० अन्वये कु.शुभांगी आंधळे, मुख्याधिकारी, नगर परिषद, देऊळगांवराजा, जि.बुलढाणा यांची ''सहाय्यक आयुक्त'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३१५</u>:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो, महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे शासन आदेश क्र.एमसीओ-१२१०/प्र.क्र.८०/नवि-१४, मंत्रालय,मुंबई. दि.१३/८/२०१० अन्वये श्रीमती.अलका खैरे, जिल्हा प्रकल्प अधिकारी, औरंगाबाद यांची ''सहाय्यक आयुक्त'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर बदली करण्यात आलेली आहे.

करिता श्रीमती.अलका खैरे, यांना रुजू झाल्याच्या तारखेपासून म्हणजे दि.९/९/२०१० रोजी मध्यान्हापूर्व ''सहाय्यक आयुक्त'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर प्रथमतः एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :श्रीमती अलका खैरे यांना ही परत पाठविण्यात येत आहे.

श्री.गिरजाराम हळनोर:पुढील जे विषय आहे ते लेखाशिर्षक बदलण्याचे आहे ते सर्व मंजूर करण्यात यावे.तसेच प्रशासनाकडून ऐनवेळचे अंदाजपत्रकाचे विषय आलेले आहे ते ही मंजूर करण्यात यावे.

या वेळी अनेक स.सदस्य डायस समोर येवून एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर :सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसून घ्यावे.सभा अशीच सुरळीतपणे सुरू होईल.मला सर्व सभागृहाचा विचार करावा लागतो ३-४ सदस्यांचा विचार करून चालत नाही.

श्री.गिरजाराम हळनोर:आता पुढील विषय घ्यावे आपल्या आदेशाचे पालन होत नसेल तर आपण त्यांचे सभासदत्व रद्द करू शकता.

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे शासन आदेश क्र.एमसीओ-१२१०/प्र.क्र.८०/नवि-१४, मंत्रालय,मुंबई. दि.१३/८/२०१० अन्वये श्रीमती.अलका खैरे, जिल्हा प्रकल्प अधिकारी, औरंगाबाद यांची ''सहाय्यक आयुक्त'' औरंगाबाद महानगरपालिका या पदावर एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३१६:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्री.गोरक्षनाथ पुंजाराम करपे, एम.पी.डब्ल्यु., महानगरपालिका पिंपरी चिंचवड यांनी अर्ज करुन विनंती केली आहे,ते भजड प्रवर्गातील उमेदवार असून दि.५/७/२००७ पासून एम.पी.डब्ल्यु. या पदावर पिंपरी चिंचवड महागरपालिकेत कार्यरत आहे. ते जालना जिल्ह्यातील रहिवासी असून त्यांचे आई वडील वयोवृध्द आहे. त्यांच्या आईला अर्धांगवायुचा त्रास सुरु असून त्यांचे वडील सतत आजारी असल्यामुळे त्यांची काळजी घेण्याकरिता व नौकरी करण्यास सोयीस्कर होण्यासाठी इ.कौटुंबिक अडचणीमुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतून औरंगाबाद महानगरपालिकेत बदली करण्याची विनंती केली आहे.

त्यानुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने औरंगाबाद महानगरपालिकेत सामावून घेण्यासाठी दि.१६/९/२००९ रोजीच्या पत्रातील अटी व शर्तीनुसार 'ना हरकत प्रमाणपत्र' दिलेले आहे. तसेच संबंधितांना या महानगरपालिकेत सामावून घेण्यासाठी दि.२०/७/२०१० रोजीच्या पत्रातील अटी व शर्तीनुसार 'ना हरकत प्रमाणपत्र' दिलेले आहे. दि.२२/१०/२००७ रोजी दिलेल्या जाहिरातीनुसार एम.पी.डब्ल्यु.संवर्गातील रिक्त असलेल्या एकूण ०४ पदांपैकी ०१ पद भजड प्रवर्गासाठी आहे.

करिता श्री.गोरक्षनाथ पुंजाराम करपे, यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतून औरंगाबाद महानगरपालिकेत 'एम.पी.डब्ल्यु.' संवर्गातील रिक्त असलेल्या भजड प्रवर्गातील पदावर सामावून घेण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

श्री.त्र्यंबक तुपे :विषय क्र. ३१६ मंजूर करावा.

श्री.गिरजाराम हळनोर :३१६ मंजूर करावे.

मा.महापौर :विषय क्र. ३१६ मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.गोरक्षनाथ पुंजाराम करपे, एम.पी.डब्ल्यु., महानगरपालिका पिंपरी चिंचवड यांची औरंगाबाद महानगरपालिकेत बदली करण्यास तसेच त्यांना औरंगाबाद महानगरपालिकेत एम.पी.डब्ल्यु.' भजड प्रवर्गासाठी असल्याने एम.पी.डब्ल्यु.' संवर्गातील रिक्त असलेल्या भजड प्रवर्गातील पदावर नियमानुसार सामावून घेण्यास मंजुरी देण्यांत येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३१७:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०/०१/२००४ ठराव/विषय क्र.२३३/३ नुसार सिडको अधिसुचित क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या क्षेत्राची विकास योजना तयार करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २३ अन्वये इरादा

जाहीर करण्यास व कलम २४ अन्वये सहाय्यक संचालक नगररचना औरंगाबाद शाखा यांची नगररचना अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यात आली होती. तसेच मा.सर्वसाधारण सभा दिनांक १८/०२/२००६ चे ठराव/विषय क्र.१९४/३ नुसार दिनांक १९/११/१९९१ ला मंजुर झालेली विकास योजना सुधारित करणे व वाढीव हद्यीच्या विकास योजना सुधारित करण्या बरोबरच सिडको अधिसुचित क्षेत्रातून वगळलेल्या भागासाठी व शिवाजीनगर या नव्याने समाविष्ठ होणाऱ्या भागासाठी अशी सर्वांची मिळुन एकच विकास योजना तयार करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २३ अन्वये इरादा जाहीर करणेस मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिली होती. तथापि महाराष्ट्र प्रादेशिक नियम व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३४ नुसार नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्राधिकारात अतिरिक्त क्षेत्र समाविष्ट करून जर त्यांचा क्षेत्राधिकार वाढण्यात आला असेल तर नियोजन प्राधिकरण अतिरिक्त क्षेत्राकरिता विकास योजना तयार करण्याचा आपला उद्देश नव्याने घोषित करील अशी तरतुद आहे. शिवाजीनगर व सिडको डिनोटीफाईड भाग हा नव्याने महानगरपालिका हद्दीत समाविष्ठ झालेला आहे. तसेच १९९१ साली शासनाने मंजुर केलेली वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व अधिनियम १९६६ चे कलम ३८ नुसार सुधारित करण्याचाही महानगरपालिकेचा मनोदय आहे. त्यासाठी उक्त ठरावात उक्त अधिनियामाच्या कलम ३४ व ३८ चाही समावेश आवश्यक आहे.

विकास योजनासाठी शासन निर्णय क्र.टि.पी.व्ही.२३१०/८७०/प्र.क्र.२२४/१०/नवि-२७ नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई-३२ दिनांक १३ जानेवारी २०११ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या विनंती/मागणी नुसार नगर विकास विभागाच्या विशेष घटकाची स्थापना करण्यास शासनाने मान्यता दिली असून उप संचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी उप संचालक, नगर रचना, विकास योजना, औरंगाबाद या पदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारला आहे. पुढील कामकाजासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये उप संचालक, नगर रचना, विकास योजना, औरंगाबाद यांची नगर रचना अधिकारी म्हणून नेमणुक होणे आवश्यक आहे.

करीता

अ) मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. २३३/३ दिनांक २०/०१/२००४ व ठराव क्र.१९४/३ दिनांक १८/०२/२००६ च्या ठरावा मध्ये,

(१) शिवाजीनगर व सिडको डिनोटीफाईड भाग हा महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ठ झालेल्या क्षेत्राची विकास योजना तयार करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३४ अन्वये मान्यता होणे,

व

(२) औरंगाबाद शहर वाढीव हद्दीसाठी शासनाने दिनांक १९/११/१९९१ ला मंजुर केलेली विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ नुसार सुधारित करणे.

अशी सुधारणा करणेस मान्यता व्हावी.

ब) उप संचालक, नगररचना, विकास योजना औरंगाबाद यांची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २४ नुसार नगर रचना अधिकारी म्हणून नेमणुक होणेस मान्यता व्हावी. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री.गिरजाराम हळनोर:विषय क्र. ३१७ मंजूर करण्यात यावा

मा.महापौर :विषय क्र. ३१७ मंजूर करण्यात येते.येथे जातीय वाद नाही त्यांचे काम बघून ठेवलेले आहे.

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. २३३/३ दिनांक २०/०१/२००४ व ठराव क्र.१९४/३ दिनांक १८/०२/२००६ च्या ठरावा मध्ये, (१) शिवाजीनगर व सिडको डिनोटीफाईड

भाग हा महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ठ झालेल्या क्षेत्राची विकास योजना तयार करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २३ सह कलम ३४ अन्वये मान्यता देणेस व (२) औरंगाबाद शहर वाढीव हद्दीसाठी शासनाने दिनांक १९/११/१९९१ ला मंजुर केलेली विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २३ सह कलम ३८ नुसार सुधारित करणेस मान्यता देणे. तसेच उप संचालक, नगररचना, विकास योजना औरंगाबाद यांची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २४ नुसार नगर रचना अधिकारी म्हणून नेमणुकीस मान्यता देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१८:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२५, सिडको एन-७ येथील अस्तित्वातील नाल्याच्या जुन्या, नादुरुस्त ठिकठिकाणी पडलेल्या दगडी भिंती काढून तेथे आर.सी.सी. नाला चॅनलींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग / म.जी.प्रा. विभागाच्या सन २००८-२००९ च्या दर सूची नुसार र.रु. २४,९९,९००/- चे तयार करण्यांत आले आहे. या कामासाठी आर्थिक वर्ष सन २०१०-२०११ या अर्थसंकल्पात "नाला ट्रेनिंग कामे" या लेखा शिर्ष अंतर्गत सिडको एन-७ ते व्ही.डी. हॉल पर्यंत नाल्यास आर सी सी चॅनलींग करणे या शिर्षाका खाली रक्कम रु. २५.०० लक्ष ची तरतुद ठेवण्यांत आलेली आहे.

करीता अंदाजपत्रक रक्कम रु. २४,९९,९००/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

श्री.गिरजाराम हळनोर :आमच्याकडे आपण लक्ष दयावे. ३१८,३१९,३२०अंदाजपत्रक आहे ३२१ लेखा शिर्षक बदलण्याचे आहे.३२२ ते ३२६ पर्यंतचे विषय मंजूर करण्यात यावे.

श्री.नासेरखॉन :गटनेताच सर्व विषय मंजूर करीत आहे.

श्री.गिरजाराम हळनोर:आम्ही मा.महापौराशी बोलत आहे आम्ही जे बोलतो मा.महापौर ऐकत आहे.३२७ मध्ये आर्थीक मोबदला मागीतला आहे महापालिकेची सध्याची परीस्थिती लक्षात घेता आर्थीक मोबदला देवू शकत नाही त्यांना टीडीआर घेण्याची विनंती करावी.३२८ मंजूर करावे ३२९ रद्द करण्यात यावे विषय क्र. ३३० ते ३३८ मंजूर करावे व प्रशासनाकडून जे ऐनवेळी अंदाजपत्रक आलेले आहे त्यास ही मंजूरी देण्यात यावी.

या वेळी मा.महापौर डायस समोर अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर :विषय क्रमांक सगळे मंजूर.

श्री.गिरजाराम हळनोर:फक्त एक दुरूस्ती आहे. रंगीन दरवाजा येथे स्व.इंदीरा गांधी यांचा पुतळा बसविण्यात यावा म्हणून त्या मार्गाला वंदेमातरम मार्ग नांव देण्यात यावे.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२५, सिडको एन-७ येथील अस्तित्वातील नाल्याच्या जुन्या, नादुरुस्त ठिकठिकाणी पडलेल्या दगडी भिंती काढून तेथे आर.सी.सी. नाला चॅनलींग करणेच्या कामासाठी सन २०१०-२०११ या अर्थसंकल्पात "नाला ट्रेनिंग कामे" या लेखा शिर्ष र.रु. २४,९९,९००/-च्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१९:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.४८ अविष्कार कॉलनी येथे क्रिडा संकूल उभारणे करिता सा.बा. विभागाचे सन २००८-०९ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रु. ३५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामाचा खर्च सन २०१०-११ या आर्थीक वर्षा अंतर्गत व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध तरतुदी नुसार करण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ३५,००,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४८ अविष्कार कॉलनी येथे क्रिडा संकूल उभारणे करिता सा.बा. विभागाचे सन २००८-०९ च्या जिल्हा दरसुची नुसार सदरील कामाचा खर्च सन २०१०-११ या आर्थीक वर्षा अंतर्गत व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध तरतुदी नुसार करण्याच्या रक्कम रु. ३५,००,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२०:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वेदांतनगर येथील उद्यान विकसीत करणे या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०१०-११ च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये २०,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पातील नविन उद्याने या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे.

तरी सदर कामाकरीता तयार करण्यांत आलेले रक्कम रुपये २०,००,०००/- चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वेदांतनगर येथील उद्यान विकसीत करणे या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०१०-११ च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये २०,००,०००/- चे अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२१:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासनाचे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वसाहतीमध्ये कामे हाती घेण्यासाठी वर्ष २०१०-२०११ साठी रुपये २०.०० लक्ष इतके अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध होणेसाठी व सदर अनुदानातुन हाती घ्यावयाच्या प्रस्तावित सुविधा कामाची ढोबळ अंदाजपत्रक मंजुरीसाठी खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | ढोबळ अ.प.रक्कम |
|---|---|---|
| ०१ | प्र.क्र.०४ वानखेडे नगर अंतर्गत एकता कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे बाबत. | १०.०० लक्ष |
| ०२ | प्र.क्र.०४ वानखेडे नगर अंतर्गत कॉक्रीट रस्ता तयार करणे बाबत. | १०.०० लक्ष |
| | **एकुण ०२ कामे** | **२०.०० लक्ष** |

तरी वर प्रस्तावित नुसार शासनाचे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत अनुदान उपलब्ध होणेस्तव उपरोक्त दोन कामासाठीचे एकत्रित रक्कम रुपये २०.०० लक्ष खर्चाचे ढोबळ अंदाजपत्रक रक्कमेचे कामे हाती घेण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभागृहाचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाचे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वसाहतीमध्ये कामे हाती घेण्यासाठी वर्ष २०१०-२०११ साठी रुपये २०.०० लक्ष इतके अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध होणेसाठी व सदर अनुदानातुन खालील कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नांव | ढोबळ अ.प.रक्कम |
|---|---|---|
| ०१ | प्र.क्र.०४ वानखेडे नगर अंतर्गत एकता कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे बाबत. | १०.०० लक्ष |
| ०२ | प्र.क्र.०४ वानखेडे नगर अंतर्गत कॉक्रीट रस्ता तयार करणे बाबत. | १०.०० लक्ष |
| | **एकुण ०२ कामे** | **२०.०० लक्ष** |

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३२२:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासनाचे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वसाहतीमध्ये कामे हाती घेण्यासाठी वर्ष २०१०-२०११ साठी रुपये ८०.०० लक्ष इतके अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध होणेसाठी व सदर अनुदानातुन हाती घ्यावयाच्या प्रस्तावित सुविधा कामाची ढोबळ अंदाजपत्रक मंजुरीसाठी खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | ढोबळ अ.प.रक्कम |
|---|---|---|
| ०१ | प्र.क्र.६७, उत्तमनगर अंतर्गत पंचशिलनगर व बौध्दनगर या भागात नविन पाण्याची डीआयके पाईप लाईन टाकणे बाबत. | १०.०० लक्ष |
| ०२ | प्र.क्र.९६ व ९७ हमालवाडा व बनेवाडी स्लम भागात ड्रेनेजचे काम करणे | २०.०० लक्ष |
| ०३ | प्र.क्र.९६ व ९७ हमालवाडा व बनेवाडी स्लम अंतर्गत पाण्याची पाईप लाईन टाकणे. | २०.०० लक्ष |
| ०४ | प्र.क्र.९६ व ९७ हमालवाडा व बनेवाडी स्लम अंतर्गत रस्त्याची कामे करणे. | २०.०० लक्ष |
| ०५ | प्र.क्र.७६ श्रीरामनगर प्रकाशनगर अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत. | १०.०० लक्ष |
| | **एकूण ०५ कामे** | **८०.०० लक्ष** |

तरी वर प्रस्तावित नुसार शासनाचे दलित वस्ती सुधार योजनांचे अनुदानातुन हाती घ्यावयाचे पाच कामासाठीचे एकत्रित रक्कम रुपये ८०.०० लक्ष खर्चाचे ढोबळ अंदाजपत्रक रक्कमेचे कामे हाती घेण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभागृहाचे विचारार्थ तथ मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासनाचे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील खालील ५ ठिकाणी नमुद केलेली कामे सन २०१०-११ साठी रूपये ८० लक्ष इतके अतिरिक्त अनुदान शासनाकडुन उपलब्ध होणेसाठी व त्यातून ही कामे हाती घेण्यासाठी रूपये ८० लक्ष खर्चाचे ढोबळ अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नांव | ढोबळ अ.प.रक्कम |
|---|---|---|
| ०१ | प्र.क्र.६७, उत्तमनगर अंतर्गत पंचशिलनगर व बौध्दनगर या भागात नविन पाण्याची डीआयके पाईप लाईन टाकणे बाबत. | १०.०० लक्ष |
| ०२ | प्र.क्र.९६ व ९७ हमालवाडा व बनेवाडी स्लम भागात ड्रेनेजचे काम करणे | २०.०० लक्ष |
| ०३ | प्र.क्र.९६ व ९७ हमालवाडा व बनेवाडी स्लम अंतर्गत पाण्याची पाईप लाईन टाकणे. | २०.०० लक्ष |
| ०४ | प्र.क्र.९६ व ९७ हमालवाडा व बनेवाडी स्लम अंतर्गत रस्त्याची कामे करणे. | २०.०० लक्ष |
| ०५ | प्र.क्र.७६ श्रीरामनगर प्रकाशनगर अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत. | १०.०० लक्ष |
| | **एकूण ०५ कामे** | **८०.०० लक्ष** |

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३२३:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र शासनाने राज्यातील वेगवेगळया शहरांचे दिर्घकालीन नियोजन करतांना विविध मुलभुत नागरी सुविधा पुरविण्याठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाची सुरवात महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक-एनयुआर-२००८/प्र.क्रं २०३/नवि-३३ दिनांक २० फेब्रुवारी २०१०.अंतर्गत केलेली असुन या अंतर्गत शासनाकडुन अनुदान व सुलभ दराने कर्ज औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.तसेच १३ व्या वित्त आयोगातुनही औरंगाबाद महानगरपालिकेस विविध नागरी सुविधा पुरविने करीता शासन अनुदान उपलब्ध करुन देणार आहे.

सदर सुधारणेच्या अनुपालनासाठी शासन निर्देश असल्याने त्या अनुषंगाने नागरी स्थानिक संस्थानी दिनांक ३१ मार्च २०१२ पर्यंत किती सुधारणा करु शकतील याबाबतचा लेखी अहवाल शासनास देवुन service level Benchmark ची प्रसिध्दी शासन दरवर्षी राजपत्रामध्ये प्रसिध्द करणार असुन सदरील कार्यवाही करीता नागरी स्थानिक संस्थाना दरवर्षी शासनास केलेल्या सुधारणांबाबतची माहिती सादर करावी लागणार असल्याने औरंगाबाद महानगरपाकिने service level Benchmark उददीष्टां अंतर्गत शासन सुधारणा अन्वये मलनि:सारण व्यवस्थापनाकरीता येणा-या खर्चाची वसुली (Extent of cost recovery in sewage Management) ही शासनास १००% अपेक्षित आहे.जे की औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत याबाबतची तरतुद अदयापही करण्यात आलेली नसल्याने महानगरपालिकेस शासन अनुदानासाठी याबाबतची तरतुद आर्थिक वर्ष सन २०११-१२ अंतर्गत अर्थसंकल्पात करणे आवश्यक आहे.

औरंगाबाद शहरात सध्यस्थिती मध्ये निवासी व व्यावसायीक असे एकुण १४६१७९ लक्ष मालमत्ता असुन महानगरपालिकेस त्यासाठी प्रतिवर्ष रु.८२५.०० लक्षचा खर्च मलनि:सारण योजनेच्या देखभाल दुरुस्तीवर करावा लागत आहे .

शासनाने विहीत केलेल्या सुधारणा प्रमाणे सदरील खर्चाची वसुली ही संबधित मालमत्ता धारकांकडुन करणे आवश्यक असल्याने याबाबत सिवेज कर आकारणी ही अर्थसंकल्प सन २०११-१२ अंतर्गत करणे आवश्यक आहे.

तदनुसार व शासन निर्देशान्वये तसेच मुंबई प्रातिक अधिनियम १९४९ चे कलम १२९ (ब ब) अन्वये औरंगाबाद महानगरपालिका हददीतील सर्व मालमत्ता धारकांकडुन मलनि:सारण व्यवस्थापन खर्च म्हणुन महानगरपालिका हददीतील सर्व मालमत्ताधारकांकडुन निवासी वापरा करीता एकुण कर योग्य मुल्यावर १३% व व्यावसायीक वापरा करीता कर योग्य मुल्यावर(N.R.V) २२ % सिवेज कर आकारणी आर्थिक वर्ष सन २०१०-२०११ पासुन लागु करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करण्यात आला असता मा.स्थायी समिती सभेने ठराव क्रं.१९५ दिनांक १४.३.२०१ अन्वये प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे.

करीता आर्थिक वर्ष सन २०१०-२०११ पासुन वरील प्रमाणे सिवेज कर आकारणी लागु करणे बाबतचा तसेच या संदर्भाने करावी लागणारी आवश्यक सर्व कार्यवाही करणे बाबत आयुक्त महानगरपालिका,औरंगाबाद यांना अधिकार प्रदान करणेबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाने राज्यातील वेगवेगळया शहरांचे दिर्घकालीन नियोजन करतांना विविध मुलभुत नागरी सुविधा पुरविण्याठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाची सुरवात महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक-एनयुआर-२००८/प्र.क्रं २०३/नवि-३३ दिनांक २० फेब्रुवारी २०१०.अंतर्गत केलेली असुन या अंतर्गत शासनाकडुन अनुदान व सुलभ दराने कर्ज औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त होणार तसेच १३ व्या वित्त आयोगातुनही औरंगाबाद महानगरपालिकेस विविध नागरी सुविधा पुरविने करीता शासन अनुदान उपलब्ध करुन देणार आहे असल्याने त्यासाठी शासनाने विहीत केलेल्या सुधारणा प्रमाणे सदरील खर्चाची वसुली ही संबधित मालमत्ता धारकांकडुन करणे आवश्यक असल्याने याबाबत सिवेज कर आकारणी ही अर्थसंकल्प सन २०११-१२ अंतर्गत करणे तसेच मुंबई प्रातिक अधिनियम १९४९ चे कलम १२९ (ब ब) अन्वये औरंगाबाद महानगरपालिका हददीतील सर्व मालमत्ता धारकांकडुन मलनि:सारण व्यवस्थापन खर्च म्हणुन महानगरपालिका हददीतील सर्व मालमत्ताधारकांकडुन निवासी वापरा करीता एकुण कर योग्य मुल्यावर १३% व व्यावसायीक वापरा करीता कर योग्य मुल्यावर(N.R.V) २२ % सिवेज कर आकारणी आर्थिक वर्ष सन २०१०-२०११ पासुन लागु करण्याचा मा.स्थायी समितीने मंजुर केलेला ठराव क्रं.१९५ दिनांक १४.३.२०१ अन्वये आर्थिक वर्ष सन २०१०-२०११ पासुन वरील प्रमाणे सिवेज कर आकारणी लागु करणे बाबतचा तसेच या संदर्भाने

करावी लागणारी आवश्यक सर्व कार्यवाही करणे बाबत आयुक्त महानगरपालिका,औरंगाबाद यांना अधिकार प्रदान करणेबाबतचा प्रस्तावास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२४:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, गणवेश विनियम २००१ नुसार सर्व वाहन चालकांना दर दोन वर्षाकरिता रु.१,२५०/- गणवेश खरेदीसाठी देण्यात येतात. परंतू वाहन चालकांनी पत्र देवून सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.३४०५/१६३/प्र.क्र.६१/२००५/२९, मंत्रालय, मुंबई-३२. दि.२८/१२/२००६ अन्वये वाहन चालकांना दर दोन वर्षातून एकदा रु.२,५००/- गणवेशाकरिता देय असल्याबाबत कळविले आहे आणि त्यानुसार त्यांना लाभ देण्याची विनंती केली आहे.

सदर शासन निर्णयात केवळ वाहन चालकांचा उल्लेख आहे. मनपा गणवेश विनियमानुसार कर निरीक्षक,जकात निरीक्षक,स्वच्छता निरीक्षक,इमारत निरीक्षक,सुरक्षा अधिकारी यांना देखील रु.१,२५०/- दर दोन वर्षातून एकदा देण्यात येतात. उक्त शासन निर्णयानुसार वाहन चालकांना वाढीव रकमेचा लाभ देतांना सदर कर्मचाऱ्यांचा देखील विचार होणे आवश्यक असून त्यांना देखील वाहन चालकाप्रमाणे लाभ देणे योग्य होईल. शासन निर्णयानुसार संबंधित कर्मचाऱ्यांनी रु.२,५००/- एवढ्या रकमेची गणवेश खरेदी करणे व त्यासंबंधीचे देयके कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. कार्यालयीन कामावर कार्यरत असतांना गणवेश परिधान न केल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. तसेच गणवेशात कोणकोणत्या बाबींचा समोवश असावा,त्याचा रंग या विषयी दि.२५ सप्टेंबर, १९९१ च्या तसेच दि.७ जून,१९९६ च्या शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या बाबी आणि गणेवश विनियम २००१ मधील तरतूदीही कायम राहतील.

करिता मनपा गणवेश विनियम २००१ मध्ये रु.१,२५० ऐवजी रु.२,५००/- दोन वर्षात एका अदा करणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गणवेश विनियम २००१ नुसार सर्व वाहन चालकांना दर दोन वर्षाकरिता रु.१,२५०/- गणवेश खरेदीसाठी देण्यात येतात. प्रस्तावात नमुद शासन निर्णय दिनांक २८.१२.२००६ नुसार रूपये २५००/- गणवेश खरेदीसाठी त्यांनी रु.२,५००/- एवढ्या रकमेची गणवेश खरेदी करणे व त्यासंबंधीचे देयके कार्यालयास सादर करणेस अधीन राहून मंजूरी देण्यात येते. तसेच कर निरीक्षक,जकात निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक, इमारत निरीक्षक,सुरक्षा अधिकारी यांना देखील रु.२,५००/- एवढ्या रकमेची गणवेश खरेदी करणे व त्यासंबंधीचे देयके कार्यालयास सादर करणेस अधीन राहून मंजूरी देण्यात येते. कार्यालयीन कामावर कार्यरत असतांना गणवेश परिधान न केल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. तसेच गणवेशात कोणकोणत्या बाबींचा समोवश असावा, त्याचा रंग या विषयी गणवेश विनियम २००१ मध्ये रु.१,२५० ऐवजी रु.२,५००/- दोन वर्षात एका अदा करणेबाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२५:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.७७ अंतर्गत कॉंक्रीट रस्ता तयार करणे व स्ट्रॉम वॉटर गटार बांधणे बाबतचे रक्कम रुपये ३४,९५,७७३/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०१०-११ च्या जिल्हादरसुचीनूसार तयार करण्यांत आलेले आहे.

सदरील कामाचा खर्च मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. २३६ दिनांक १७.०२.२०११ नुसारच्या वळती तरतुद रक्कम रुपये ३५.०० लक्ष मधून करण्यात येणार आहे.

करीता वार्ड क्र.७७ अंतर्गत कॉंक्रीट रस्ता तयार करणे व स्ट्रॉम वॉटर गटार बांधणे बाबतचे रक्कम रुपये ३४,९५,७७३/-चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथापि मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.७७ अंतर्गत कॉंक्रीट रस्ता तयार करणे व स्ट्रॉम वॉटर गटार बांधण्यासाठी रक्कम रुपये ३४,९५,७७३/- चे अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते तसेच सदरचे काम

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. २३६ दिनांक १७.०२.२०११ अन्वये वळती करण्यात आलेली रक्कम रू. ३५.०० लक्ष तरतुदीतून करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२६:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.७७ अंतर्गत जैन मंदिर मागील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत राजमाता जिजाऊ मॉ साहेब महिला उद्यानास संरक्षित भिंत बांधणे व नाल्यावर स्लॅब टाकणे बाबतचे रक्कम रुपये ३९,९८,४५७/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०१०-११ च्या जिल्हा दरसुचीनूसार तयार करण्यांत आलेले आहे.

सदरील कामाचा खर्च मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. २३८ दिनांक १७.०२.२०११ नुसारच्या वळती तरतुद अर्थसंकल्प सन २०१०-११ मधील नविन उद्याने लेखाअंतर्गत एसआसी जी १ अ.क्र.१५ च्या तरतुदीतुन करण्यात येणार आहे.

करीता वॉर्ड क्र.७७ अंतर्गत जैन मंदिर मागील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत राजमाता जिजाऊ मॉ साहेब महिला उद्यानास संरक्षित भिंत बांधणे व नाल्यावर स्लॅब टाकणे बाबतचे रक्कम रुपये ३९,९८,४५७/- चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथापि मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.७७ अंतर्गत जैन मंदिर मागील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत राजमाता जिजाऊ मॉ साहेब महिला उद्यानास संरक्षित भिंत बांधणे व नाल्यावर स्लॅब टाकणे बाबतचे रक्कम रुपये ३९,९८,४५७/- चे अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. २३८ दिनांक १७.०२.२०११ नुसार वळती तरतुद अर्थसंकल्प सन २०१०-११ मधील नविन उद्याने लेखाअंतर्गत एसआसी जी १ अ.क्र.१५ च्या तरतुदीतुन करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२७:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, RCA No.३८८/०५ व १५१ /०६ मध्ये मौजे गारखेडा, विद्यानगर येथील श्री.पटवारी व इतर सहा (न.भू.क्र. १५२०२ व १५१८८ ते १५१९४, प्लॉट नं. १ २०, २१, २३, ३४, ४६, ४७) भुखंडधारकांना पोच रस्ता देणेचा मा.जिल्हा न्यायालय औरंगाबाद यांनी निर्णय दिला आहे. त्यानुसार न.भू.क्र. १५१८७/A-१ ते १५१८७/A-७ विजयनगर रेखांकनातील भुखंडा क्र १ ते ७ मधून ४.० मीटर रुंद जमिनी भुसंपादन करणे आवश्यक आहे. तथापि न.भू.क्र. १५१८७/A-१ ते १५१८७ /A-७ प्लॉट नं. १ ते ३ श्री. साबरवाल यांनी ४.० मी. रुंद जागा महानगरपालिका औरंगाबाद नोंदणीकृत हक्कसोड पत्रान्वये हस्तांतर केलेली आहे.

करीता उर्वरित न.भू.क्र. १५१८७ / A-४ ते १५१८७ / A-७ प्लॉट न. ४ ते ७ या चार भुखंडामध्ये ४.० मीटर रुंद जमीन संपादित करावी लागेल.

संपादनाखालील क्षेत्र ८०.० x ४.० = ३२० चौ.मी. संपादनासाठी अदांजे खर्च रक्कम रु. ३९,०७,४८०/- जागा संपादनासाठी एकुण खर्च ३९,०७,४८०/- अपेक्षीत आहे. उक्त जमीन संपादनासाठी मोबदला रक्कमेसह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर सदरील खर्चास मान्यता होणे आवश्यक असून मा. न्यायालयाचे निर्देशानुसार प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे मा.आयुक्त महानगरपालिका यांचे मान्यतेने पाठविण्यात आला आहे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे RCA No.३८८/०५ व १५१ /०६ मध्ये मौजे गारखेडा,विद्यानगर येथील श्री.पटवारी व इतर सहा यांनी भुखंडधारकांना पोच रस्ता देणेचा मा.जिल्हा न्यायालय औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्णयानुसार न.भू.क्र. १५१८७/A-१ ते १५१८७/A-७ विजयनगर रेखांकनातील भुखंडा क्र १ ते ७ मधून ४.०मीटर रुंद जमिनी भुसंपादन करणे तसेच न.भू.क्र. १५१८७/A-१ ते १५१८७ /A-७ प्लॉट नं. १ ते ३ श्री. साबरवाल यांनी ४.० मी. रुंद जागा महापालिकेस हस्तांतर केली त्यानुसार उर्वरित न.भू.क्र.१५१८७/A-४ ते १५१८७/A-७ प्लॉट न. ४ ते ७ या चार भुखंडामध्ये ४.०मीटर रुंद

जमीन संपादित करण्यास व या रस्त्यासाठी संपादना खालील क्षेत्राचे मोबदल्याची अपेक्षित रक्कम रु. ३९,०७,४८०/- च्या खर्चास आणि मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविलेल्या प्रस्तावासही मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२८:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, जयसिंगपुरा हनुमान टेकडी भागातील जलकुंभ ६१०.५ मी. पातळीवर असून सदरील जलकुंभास नक्षत्रवाडी M.B.R. (६२८ मी.) येथुन गुरुत्ववाहीनीद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. या गुरुत्ववाहीनी द्वारे कमी दाबाने पाणी पुरवठा झाल्यास हनुमान टेकडी येथील जलकुंभ पुर्णपणे भरला जात नाही. पर्यायाने या भागातील जनतेस कमी प्रमाणात पाणी पुरवठा होतो. तसेच जुबलीपार्क पंपगृह येथुन पंपीगद्वारे विद्यापीठ, मेडीकल व जुबलीपार्क येथील जलकुंभास पाणी पुरवठा करण्यात येतो.

हनुमान टेकडी जलकुंभास योग्य दाबाने तसेच विद्यापीठ, मेडीकल व जुबलीपार्क येथील जलकुंभास योग्य प्रमाणात पाणी पुरवठा करण्यासाठी वर्ष २००९ मध्ये व्हॅन पंप ॲड कंट्रोल सिस्टीम प्रा.लि.पुणे या संस्थेचे सहकार्य घेऊन संपूर्ण यंत्रणेचा आभ्यास करण्यात आला. या भागात योग्य दाबाने पाणी पुरवठा करण्यासाठी जुबलीपार्क पंपगृह परिसरात सात MLD क्षमतेच्या ऑन लाईन बुस्टर योजनेचे संकल्पन करण्यात आले. या योजनेसाठी वर्ष २००९ च्या अंदाजपत्रकानुसार रक्कम रु. ४४,७१,०१०/- खर्च येतो. मागील दोन वर्षातील पंपीग मशिनरीच्या दरामध्ये झालेली दरवाढ लक्षात घेता सदरील योजनेस अंदाजे रक्कम रु. ५०.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. तरी जुबलीपार्क पंपगृह परिसरात ऑन लाईन बुस्टर योजना उभारणी करणे व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ५०.०० लक्ष खर्चाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हनुमान टेकडी जलकुंभास योग्य दाबाने तसेच विद्यापीठ, मेडीकल व जुबलीपार्क येथील जलकुंभास योग्य प्रमाणात पाणी पुरवठा करण्यासाठी वर्ष २००९ च्या अंदाजपत्रकानुसार रक्कम रु. ४४,७१,०१०/-हा मागील दोन वर्षातील पंपीग मशिनरीच्या दरामध्ये झालेली दरवाढ लक्षात घेता जुबलीपार्क पंपगृह परिसरात ऑन लाईन बुस्टर योजना उभारणी करणे व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ५०.०० लक्ष खर्चाचा प्रस्तावास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२९:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.७२ मधील जालना रोड वसंतराव नाईक पुतळा ते हायकोर्ट रस्त्यालगत असलेल्या हरित पट्टा या कामाचा सौदर्यकरण करणेच्या कामाचे अ.प.सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०१०-२०११ दरसुची नुसार रक्कम रुपये ६९९८३००/- चे अंदाज पत्रक तयार करण्यांत आलेले आहे. या कामाचा खर्च सन २०१०-२०११ या आर्थीक वर्षात हरित औरंगाबाद योजना या लेखाशिर्षका मधून करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये ६९९८३००/- च्या अं.प.चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव व विचारास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.७२ मधील जालना रोड वसंतराव नाईक पुतळा ते हायकोर्ट रस्त्यालगत असलेल्या हरित पट्टा या कामाचा सौदर्यकरण करणेच्या कामाचे सन २०१०-२०११ दरसुची नुसार हरित औरंगाबाद योजना या लेखाशिर्षका मधून रक्कम रुपये ६९९८३००/- चे अंदाज पत्रकास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३०:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दितील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे मराठवाडयातुन दररोज रुग्ण औषधोपचारासाठी येतात व त्यांच्या सोबत अनेक नातेवाईक सुध्दा येतात परंतु या भागात पिण्याचे पाण्याची व्यवस्था नसल्याने फार त्रास

होत आहे. अनेक लोकांच्या मागणीनुसार मकाई गेट येथील वार्ड क्र.२,३,४,५,६,७ व ८ या परिसरात माझ्या स्वेच्छा निधीतुन पिण्याचे पाण्याची पाणपोई बांधण्यात यावी जेणेकरुन येथे रुग्णांना व सोबत येणाऱ्या नातेवाईकांना पिण्याचे पाण्याची सोय होईल.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक:श्रीमती हेमलता प्रकाश मुगदीया,

अनुमोदक: श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली, डॉ.खान जफर अहेमद, श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद महानगरपालिका हद्दितील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे लोकांच्या मागणीनुसार मकाई गेट येथील वार्ड क्र.२,३,४,५,६,७ व ८ या परिसरात श्रीमती हेमलता प्रकाश मुगदीया यांच्या स्वेच्छा निधीतुन पिण्याचे पाण्याची पाणपोई बांधण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३१:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दितील सुभेदारी गेस्ट हॉऊस समोरील रंगीन गेट येथील खुल्या जागेत भारताचे माजी पंतप्रधान स्व.इंदिराजी गांधी यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यांत यावा व रंगीन गेट ते भडकल गेट पर्यंतच्या रस्त्यास स्व.इंदिराजी गांधी मार्ग असे नांव देण्यांत यावे.

तसेच हर्सूल टी पांईट येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व.शंकररावजी चव्हाण यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यांत यावा व सदरील चौकाचे सौदर्यकरण करण्यांत यावा.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती हेमलता प्रकाश मुगदीया,

अनुमोदक : श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली, डॉ.खान जफर अहेमद, श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दितील सुभेदारी गेस्ट हॉऊस समोरील रंगीन गेट येथील खुल्या जागेत भारताचे माजी पंतप्रधान स्व.इंदिराजी गांधी यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यांस व रंगीन गेट ते भडकल गेट पर्यंतच्या रस्त्यास स्व.इंदिराजी गांधी मार्ग असे नांव देण्यांस तसेच हर्सूल टी पांईट येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व.शंकररावजी चव्हाण यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यांत यावा व सदरील चौकाचे सौदर्यकरण करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३२:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२३ मसनतपुर, चिकलठाणा या वार्डासाठी अर्थसंकल्प सन २०१०-११ मध्ये असलेल्या खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यांत यावे.

| अ.क्र. | पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| ०१ | SCR-B-१ | वार्ड क्र.२३ मनपा शाळा दुरुस्ती करणे. रु.५.०० लक्ष | मसनतपुर वार्ड क्र २३ ड्रेनेज दुरुस्ती करणे. रु. ५.०० लक्ष |
| ०२ | GBR-E-१ | वार्ड क्र. २३ अंतर्गत रस्ते् दुरुस्ती करणे रु. ५.०० लक्ष | वार्ड क्र. २३ विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे. रु. ५.०० लक्ष |
| ०३ | GBR-E-४ | वार्ड क्र. २३ लायन्स कॉक्रीट रस्ता तयार करणे. रु. ५.०० लक्ष | वार्ड क्र. २३ विविध ठिकाणी रस्ता दुरुस्ती करणे. रु. ५.०० लक्ष |

करीता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.चौधरी संजय सांडू अनुमोदक : डॉ.खान जफर अहेमद

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२३ मसनतपुर, चिकलठाणा या वार्डासाठी अर्थसंकल्प सन २०१०-११ मध्ये असलेल्या खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यांस मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| ०१ | SCR-B-१ | वार्ड क्र.२३ मनपा शाळा दुरुस्ती करणे. रु.५.०० लक्ष | मसनतपुर वार्ड क्र २३ ड्रेनेज दुरुस्ती करणे. रु. ५.०० लक्ष |
| ०२ | GBR-E-१ | वार्ड क्र. २३ अंतर्गत रस्ते् दुरुस्ती करणे रु. ५.०० लक्ष | वार्ड क्र. २३ विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे. रु. ५.०० लक्ष |
| ०३ | GBR-E-४ | वार्ड क्र. २३ लायन्स कॉक्रीट रस्ता तयार करणे. रु. ५.०० लक्ष | वार्ड क्र. २३ विविध ठिकाणी रस्ता दुरुस्ती करणे. रु. ५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३३:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, राष्ट्रीय पातळीवरील स्केटींग स्पर्धा औरंगाबाद शहरामध्ये आयोजन करण्यांत येत आहे. या स्पर्धेसाठी देशभरातुन जवळपास १२०० खेळाडू मुले- मुली सहभागी होत आहे व स्थानिक औरंगाबाद जिल्हयातुन जवळपास ४०० ते ५०० खेळाडू सहभागी होणार आहे. या स्पर्धेसाठी एकूण खर्च जवळपास दहा लाख रु. अपेक्षीत असून यापैकी रु. ५ लाख प्रायोजक बाहेरुन मिळणार असून, व उर्वरित रक्कम ५ लक्ष रु. मनपा आर्थिक मदत देवून ही स्पर्धा महापौर चषक या नावाने घेण्यात यावी ही नम्र विनंती.

सुचक: श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव अनुमोदक: श्री.मधुकर दामोधर सावंत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राष्ट्रीय पातळीवर औरंगाबाद येथे स्केटींग स्पर्धासाठी देशभरातुन व स्थानिक औरंगाबाद जिल्हयातुन खेळाडू सहभागी होणार असल्याने या स्पर्धेसाठी महानगरपालिकेतर्फे नियमानुसार आर्थिक मदत देण्यास व ही स्पर्धा महापौर चषक या नावाने घेण्यास मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३४:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.०२ मयुर पार्क जाधववाडी येथील विकास कामासाठी अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यांत आलेली असून खालील कामाऐवजी सुधारीत कामासाठी तरतुद ठेवण्यांत येवून कामे हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्त सादर.

| प्रस्तावीत विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|
| १. वार्ड क्र.०२ मयुर पार्क जाधववाडी कॉक्रेटींकरण करणेसाठी अर्थसंकल्पात पान क्र.जीबीआर-बी-४ अ.क्र.१ रक्कम रु. १० लक्ष ठेवण्यांत आली. | १. वार्ड क्र.०२ मयुरपार्क जाधववाडी येथील विविध ठिकाणी नविन रस्ते डांबरीकरण रु. १० लक्ष. |

सुचक: श्रीमती सुरे सविता संतोष अनुमोदक: श्री.गादगे विरभद्र रामलींग, श्री.बन्सी ग्यानु जाधव

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.०२ मयुर पार्क जाधववाडी येथील विकास कामासाठी अर्थसंकल्पात असलेल्या तरतुदीचे खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावीत विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|
| १. वार्ड क्र.०२ मयुर पार्क जाधववाडी कॉक्रेटींकरण करणेसाठी अर्थसंकल्पात पान क्र.जीबीआर-बी-४ अ.क्र.१ रक्कम रु. १० लक्ष ठेवण्यांत आली. | १. वार्ड क्र.०२ मयुरपार्क जाधववाडी येथील विविध ठिकाणी नविन रस्ते डांबरीकरण रु. १० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३५:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २०१०-११ च्या अर्थसंकल्प पुस्तीकात लेखाशिर्षक "वार्ड क्रमांक २९" मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे पान क्रमांक GBR-C-१० अ.क्र.०१ वर रक्कम रु. १५.०० लक्ष.

या कामाऐवजी

वार्ड क्रमांक २९ अंतर्गत विविध ठिकाणी इटालीयन पेव्हर ब्लॉक बसविणे रक्कम रु.१५.०० लक्ष

सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक: श्रीमती जरीना म.जावेद अनुमोदक : श्री.शेख खाजा शरफोद्दीन

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१०-११ च्या अर्थसंकल्प पुस्तीकात लेखाशिर्षक "वार्ड क्रमांक २९" मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे पान क्रमांक GBR-C-१० अ.क्र.०१ वर रक्कम रु. १५.०० लक्ष.

या कामाऐवजी

वार्ड क्रमांक २९ अंतर्गत विविध ठिकाणी इटालीयन पेव्हर ब्लॉक बसविणे रक्कम रु.१५.०० लक्ष चे प्रस्तावास मंजुरी देण्यांत, येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३६:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.७०, विजयनगर, गारखेडा येथील वसाहतील ५० टक्केहुन अधिक दलित वस्ती आहेत. सदरील वसाहती मध्ये गेल्या ४-५ वर्षापासून नागरीक मुलभुत सुविधा उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या नाहीत. ज्यामुळे या परिसरातील नागरीकांचे हाल होत आहे. करिता दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत खालील सुविधांसाठी तरतुद देऊन काम हाती घेण्याबाबतचा प्रस्तावास प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

०१) वार्ड क्र.७०, विजयनगर येथे विविध ठिकाणी नविन ड्रेनेज लाईन टाकणे रु. २०.०० लक्ष
०२) वार्ड क्र.७०, विजयनगर येथील अंतर्गत रस्ते कॉक्रेटींग करणे रु. २०.०० लक्ष

सुचक: श्रीमती कला रविनंदन ओझा अनुमोदक : श्रीमती सुरडकर साधना गणेश

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.७०, विजयनगर, गारखेडा येथील वसाहतील दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत खालील सुविधांसाठी तरतुद देऊन काम हाती घेण्याबाबतच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

०१) वार्ड क्र.७०, विजयनगर येथे विविध ठिकाणी नविन ड्रेनेज लाईन टाकणे रु. २०.०० लक्ष
०२) वार्ड क्र.७०, विजयनगर येथील अंतर्गत रस्ते कॉक्रेटींग करणे रु. २०.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३७:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.१९, शिवनेरी कॉलनी म्हाडा कॉलनी येथील शिवनेरी कॉलनीत असलेल्या महानगरपालिकेचे शिवनेरी सभागृह आहे. सदरील सभागृहाला शटर लावलेले आहेत. नागरीकांची मागणी आहे की, शटर काढून भिंत व ग्रील बसविण्यात यावी. तसेच शटर समोर असलेले २० x २० चे ओपन ओटा काढून टाकण्याबाबत नागरिकांची मागणी आहे. कारण या ओटयामुळे मागील बाजुस असलेल्या मंदिरात जाण्यास भाविकांना त्रास होत आहे.

करिता सदरील ओटा काढून टाकण्याबाबत व तेथे पेव्हर ब्लॉक बसविण्याबाबतची कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.अनिल जुगललाल जैस्वाल अनुमोदक : श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१९, शिवनेरी कॉलनी म्हाडा कॉलनी येथील महानगरपालिकेचे शिवनेरी सभागृहाला लावलेले शटर काढून भिंत व ग्रील बसविण्यास तसेच शटर समोर असलेले २० x २० चे ओपन ओटा काढून तेथे पेव्हर ब्लॉक बसविण्यास मंजुरी देण्यांत येते वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३८:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.८३ येथील विकास कामासाठी सन २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यांत आलेली असून सदरील कामा ऐवजी सुधारीत लेखाशिर्षकातील कामाच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

| | **प्रस्तावित लेखाशिर्षक** | **सुधारीत लेखाशिर्षक** |
|---|---|---|
| ०१ | वार्ड क्र.८३ अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत व्यवस्थेची कामे करणे अर्थसंकल्प पान क्र.४३ अ.क्र.१५ वर रु. ०५.०० लक्ष तरतुद ठेवण्यांत आले आहे. | वार्ड क्र.८३ छत्रपती शिवाजी महाराज पुतळा शिवाजी चौक या ठिकाणी हायमास्ट बसविणे रु. ०५.०० लक्ष |

सुचक : श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव,

अनुमोदक:श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव,श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने,श्री.वैद्य रेणुकादास(राजू)दत्तोपंत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.८३ येथील विकास कामासाठी असलेल्या तरतुदीचे खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| | **प्रस्तावित लेखाशिर्षक** | **सुधारीत लेखाशिर्षक** |
|---|---|---|
| ०१ | वार्ड क्र.८३ अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत व्यवस्थेची कामे करणे अर्थसंकल्प पान क्र.४३ अ.क्र.१५ वर रु. ०५.०० लक्ष तरतुद ठेवण्यांत आले आहे. | वार्ड क्र.८३ छत्रपती शिवाजी महाराज पुतळा शिवाजी चौक या ठिकाणी हायमास्ट बसविणे रु. ०५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३९:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, कु.दिपाली ज्ञानेश्वर चव्हाण रा.एन-७, F-५७-७ आयोध्यानगर सिडको, वार्ड क्र.२५ ही होतकरु विद्यार्थीनी मेंदुच्या दुर्धर आजाराने त्रस्त असून तिच्या आजारावर उपचारासाठी रु.०१.०० लक्ष मनपा तर्फे मदत देण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सूचक :- श्री.काशिनाथ कोकाटे अनुमोदक:श्री.प्रल्हाद निमगांवकर, श्री.अभिजित देशमुख

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कु.दिपाली ज्ञानेश्वर चव्हाण रा.एन-७, F-५७-७ आयोध्यानगर सिडको, ही होतकरु विद्यार्थीनी मेंदुच्या दुर्धर आजाराने त्रस्त असून तिच्या आजारावर उपचारासाठी रु.०१.०० लक्ष मनपा तर्फे मदत देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३४०:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.८० या वॉर्डासाठी अर्थसंकल्प सन २०१०-११ मध्ये असलेल्या खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यांत यावे.

| **पा.क्र.व.अ.क्र.** | **कामाचे नांव (जुने लेखाशिर्ष)** | **सुधारीत लेखाशिर्ष** |
|---|---|---|
| १.GBR-E-४<br>अ.क्र.१ | वार्ड क्र.८० अंबिकानगर संतोषीमाता नगर येथील पुलाची उंची वाढवणे र.रु. २०.०० लक्ष. | वार्ड क्र.८० मध्ये अंबिकानगर गल्ली न. १ ते ६ मारोतीच्या मंदिरा पर्यंत नाला चॅनलिंग करणे र.रु. २०.०० लक्ष. |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती कमलताई रामचंद्र नरोटे अनुमोदक : श्री.कुचे नारायण तिलोकचंद

**<u>ठराव</u> :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.८० अर्थसंकल्प सन २०१०-११ मधील खालील लेखा शिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यांत येते

| पा.क्र.व.अ.क्र. | कामाचे नांव (जुने लेखाशिर्ष) | सुधारीत लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १.GBR-E-४ अ.क्र.१ | वार्ड क्र.८० अंबिकानगर संतोषीमाता नगर येथील पुलाची उंची वाढवणे र.रु. २०.०० लक्ष. | वार्ड क्र.८० मध्ये अंबिकानगर गल्ली न. १ ते ६ मारोतीच्या मंदिरा पर्यंत नाला चॅनलिंग करणे र.रु. २०.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३४१:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.३३, गुलमंडी येथे महानगरपालिकेने उद्यानासाठी / पार्कसाठी जागा संपादन केली असून ती महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. सदर संपादित झालेल्या खुल्या जागेमध्ये जुने वरखेड लक्ष्मीदेवीचे मंदिर आहे. तरी सदर जागेत मंजुर विकास योजनेनुसार उद्यान / पार्क विकसित करण्यात येवून या उद्यानास / पार्कला श्री. वरखेड लक्ष्मीदेवी उद्यान असे नांव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार अनुमोदक : श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे वार्ड क्र.३३, गुलमंडी येथे महानगरपालिकेने उद्यानासाठी / पार्कसाठी संपादन केलेल्या खुल्या जागेमध्ये मंजुर विकास योजनेनुसार उद्यान / पार्क विकसित करण्यास तसेच त्या उद्यानास / पार्कला श्री. वरखेड लक्ष्मीदेवी उद्यान असे नांव देण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३४२:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, खालील लेखा शिर्ष बदलण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा ही विनंती.

**प्रस्तावीत विकास काम**

GBR-A-८ भाडवलीकामे अ.क्र.६

वार्ड क्र.०९ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे रु. १०.०० लक्ष

**या कामा ऐवजी सुधारीत काम**

वार्ड क्र.०९ मध्ये पाथवे तयार करुन गट्टू बसविणे रु. १०.०० लक्ष

सुचक : श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे अनुमोदक : श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद

**<u>ठराव</u> :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खालील लेखा शिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यांत येते

**प्रस्तावीत विकास काम**

GBR-A-८ भाडवलीकामे अ.क्र.६

वार्ड क्र.०९ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे रु. १०.०० लक्ष

**या कामा ऐवजी सुधारीत काम**

वार्ड क्र.०९ मध्ये पाथवे तयार करुन गट्टू बसविणे रु. १०.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३४३:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २०१०-२०११ या वर्षात भांडवली कामे या शिषर्कात पान क्र.जीबीआर-बी-९ वर ६० लक्ष तरतुद करण्यांत आली होती. सदरील रक्कमेतुन इतर कामे करण्यासाठी वळतीकरण्याकरीता दिनांक १७.०२.२०११ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील

ठराव क्र.२२८ प्रमाणे मंजुर ही करण्यांत आला होता. परंतु सन २०११-२०१२ या चालु आर्थिक वर्षात अर्थसंकल्पात वार्ड -ब न्यु वर्क्स पान क्र.१९ वर पुन्हा एकुण ६० लक्षाची तरतुद ठेवण्यांत आलेली आहे. करीता खालील प्रस्तावित कामाऐवजी सुधारीत कामासाठी तरतुद ठेवण्यात येवुन कामा हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| | प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|---|
| ०१ | वार्ड क्र.२२ विविध ठिकाणी जलवाहिणी टाकणे साठी सन २०११-२०१२ अर्थसंकल्पात पान क्र.१९ वर रु. ६० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | ०१. मनपा केंद्रीय प्राथमिक शाळेसाठी नारेगांव येथे दोन खोल्या बांधणे रु. २० लक्ष.<br>०२. शामप्रसाद मुखर्जी सांस्कृतीक सभागृहाच्या समोर पत्राचे शेड व कंपाऊड वॉल व इतर कामे करणे रु. २०.०० लक्ष.<br>०३. नारेगांव मुख्य रस्त्यावरील मुख्य ड्रेनेज लाईन बदलणे रु. ०७.०० लक्ष.<br>०४. नारेगांव येथील गार्डन विकसीत करणे रु. ०७.०० लक्ष.<br>०५. नारेगांव वार्डातील बालउद्यानात व परिसरात विविध ठिकाणी लाईटची व्यवस्था करणे. रु. ०३.०० लक्ष.<br>०६. नारेगांव येथे खुल्या गटार बांधणे रु. ०३.०० लक्ष. |

सुचकः श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत, अनुमोदकः श्री.गादगे विरभद्र रामलींग, श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२२ अर्थसंकल्प सन २०११-१२ मधील खालील लेखा शिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यांत येते

| | प्रस्तावित विकास काम | सुधारीत विकास काम |
|---|---|---|
| ०१ | वार्ड क्र.२२ विविध ठिकाणी जलवाहिणी टाकणे साठी सन २०११-२०१२ अर्थसंकल्पात पान क्र.१९ वर रु. ६० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | ०१. मनपा केंद्रीय प्राथमिक शाळेसाठी नारेगांव येथे दोन खोल्या बांधणे रु. २० लक्ष.<br>०२. शामप्रसाद मुखर्जी सांस्कृतीक सभागृहाच्या समोर पत्राचे शेड व कंपाऊड वॉल व इतर कामे करणे रु. २०.०० लक्ष.<br>०३. नारेगांव मुख्य रस्त्यावरील मुख्य ड्रेनेज लाईन बदलणे रु. ०७.०० लक्ष.<br>०४. नारेगांव येथील गार्डन विकसीत करणे रु. ०७.०० लक्ष.<br>०५. नारेगांव वार्डातील बालउद्यानात व परिसरात विविध ठिकाणी लाईटची व्यवस्था करणे. रु. ०३.०० लक्ष.<br>०६. नारेगांव येथे खुल्या गटार बांधणे रु. ०३.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३४४:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वेदांतनगर येथील नगर भु.मा.क्र. १८३४९/१ /१०० येथील महानगरपालिकेची १५०० चौ.मी जागा विक्रीकर कार्यालय यांना देण्यांत आलेली होती. मा.न्यायालयाच्या आदेशान्वये क्र. RCS४४५/९१ दिनांक ०९.१०.२००० अन्वये मनाई हुकूम दिल्याने सदरील जागा महानगरपालिकेने परत घ्यावी, तसेच सिटी सर्व्हे कार्यालयाकडून ती जागा मनपाच्या नांवे करुन घेण्यात यावी. तसेच महानगरपालिकेने ज्या ठरावान्वये ही जागा विक्रीकर कार्यालय यांना दिली होती तो ठराव रद्द करण्यात यावा.

सुचक : श्री.जैन विकास रतनलाल अनुमोदक : श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वेदांतनगर येथील नगर भु.मा.क्र. १८३४९/१ /१०० येथील महानगरपालिकेची १५०० चौ.मी जागा विक्रीकर कार्यालय यांना देण्यांत आलेली होती. मा.न्यायालयाच्या आदेशान्वये क्र. RCS४४५/९१ दिनांक ०९.१०.२००० अन्वये मनाई हुकूम दिल्याने सदरील जागा महानगरपालिकेने परत घेण्यास, तसेच सिटी सर्व्हे कार्यालयाकडून ती जागा मनपाच्या नांवे करुन

घेण्यास व महानगरपालिकेने ज्या ठरावान्वये ही जागा विक्रीकर कार्यालय यांना दिली होती तो ठराव रद्द करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३४५:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.६० मधील मनपा अर्थसंकल्प २०१०-२०११ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यांत यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. व अ.क्र. | २०१०-२०११ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे. |
|---|---|---|
| अ.क्र.२ Word D New work ३४ | वार्ड क्र.६० मध्ये बिफ मार्केट येथे दुकाने बांधणे आर्थिक तरतुद रु. ३२.०० लाख | ०१. वार्ड क्र.५३ मध्ये विविध ठिकाणी विद्युत दिवे लावणे रु. ०७.०० लाख<br>०२. वार्ड क्र.६० मध्ये विविध ठिकाणी विद्युत दिवे लावणे रु. १०.०० लाख<br>०३. वार्ड क्र.६० मध्ये ड्रेनेज लाईनचे विविध कामे करणे रु. १५.०० लाख |

सुचक:श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान अनुमोदक:डॉ.खान जफर अहेमद,
श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे वार्ड क्र.६० मधील मनपा अर्थसंकल्प २०१०-२०११ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यांस मंजूरी देण्यात येते.

| पान क्र. व अ.क्र. | २०१०-२०११ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे. |
|---|---|---|
| अ.क्र.२ Word D New work ३४ | वार्ड क्र.६० मध्ये बिफ मार्केट येथे दुकाने बांधणे आर्थिक तरतुद रु. ३२.०० लाख | ०१. वार्ड क्र.५३ मध्ये विविध ठिकाणी विद्युत दिवे लावणे रु. ०७.०० लाख<br>०२. वार्ड क्र.६० मध्ये विविध ठिकाणी विद्युत दिवे लावणे रु. १०.०० लाख<br>०३. वार्ड क्र.६० मध्ये ड्रेनेज लाईनचे विविध कामे करणे रु. १५.०० लाख |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३४६:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या सिध्दार्थ जलतरण तलाव येथुन मनपास सन १९९४ पासुन अंदाजे १० ते १२ लक्ष रुपये सरासरी महसूल प्राप्त होत होते परंतु या वर्षी जलतरण तलाव येथे कार्यरत असलेले श्री.अभय देशमुख यांच्याकडे प्रभारी जलतरण तलाव व्यवस्थापक म्हणुन नियुक्ती केली असता त्यांनी कार्यरत सर्व कर्मचारीसह जास्त प्रमाणांत परिश्रम घेत सन २०१०-११ मध्ये रक्कम रुपये ३६,१७,३६५/-(छत्तीस लक्ष सतरा हजार तीनशे पहासष्ठ रुपये) महसूल मनपास मिळवुन दिलेला आहे. आता पर्यंत कधी इतका महसूल मनपा सिध्दार्थ जलतरण मार्फत मिळालेला नव्हता.

करीता सिध्दार्थ जलतरण तलावातील सर्व कार्यरत कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्याचा तथा व्यवस्थापक व विभाग प्रमुखांना प्रशस्तीपत्र देण्याचा प्रस्ताव तथा मिळालेल्या रक्कमेतुन बक्षीस म्हणुन ५% रक्कम कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांना विभागुन देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सविनय सादर.

सुचक : श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
अनुमोदक : श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र, श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ,
श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम, श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ जलतरण तलावातील सर्व कार्यरत कर्मचारी यांनी परिश्रम घेत इतर वर्षापेक्षा सन २०१०-११ मध्ये रक्कम रुपये ३६,१७,३६५/-(छत्तीस लक्ष सतरा हजार तीनशे पासष्ट रुपये) महसूल मनपास मिळवुन दिलेला असल्याने त्यांचे अभिनंदन करण्यास तसेच व्यवस्थापक व विभाग प्रमुखांना प्रशस्तीपत्र देण्यास व मिळालेल्या जादा रक्कमेतुन बक्षीस म्हणुन ५% रक्कम कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांना विभागुन देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३४७:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या सिध्दार्थ जलतरण तलाव येथुन मनपास सन १९९४ ते २००५ पर्यंत ०६ ते १२ लक्ष रुपये सरासरी महसूल प्राप्त होत होते तथापी लेखा परिक्षण विभागाने आर्थीक वर्ष २००८-२००९ मध्ये सिध्दार्थ जलतरण विभागाचे विशेष लेखा परिक्षण हाती घेण्यात आल्यानंतर भ्रष्टाचाराबाबत लेखापरिक्षण विभागाने मोठया प्रमाणांत आक्षेप नोंदविण्यांत आल्यानंतर त्या विभागातील कर्मचाऱ्यांना निलंबित केल्यानंतर सन २०१०-११ मध्ये रक्कम रुपये ३६,१७,३६५/-(छत्तीस लक्ष सतरा हजार तीनशे पहासष्ठ रुपये) महसूल मनपास मिळण्यास सहकार्य झालेले आहे.

करिता सिध्दार्थ जलतरण तलावाचे लेखा परिक्षण करणारे लेखा परिक्षण विभागातील अथक परिश्रम करणारे सर्व कार्यरत कर्मचाऱ्याचे अभिनंदन करण्याचा तथा रोख रुपये १००१/- चे बक्षीस व प्रशस्तीपत्र देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सविनय सादर.

सुचक:श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

अनुमोदक:डॉ.खान जफर अहेमद,श्रीमती रेखा अजित जैस्वाल

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ जलतरण तलावाचे लेखा परिक्षण करणारे लेखा परिक्षण विभागातील अथक परिश्रम करणारे सर्व कार्यरत कर्मचारी यांनी सन २०१०-११ मध्ये रक्कम रुपये ३६,१७,३६५/-(छत्तीस लक्ष सतरा हजार तीनशे पहासष्ठ रुपये) महसूल मनपास मिळण्यास सहकार्य केलेले आहे. त्यामुळे त्यांचा अभिनंदन करण्याचा तथा रोख रुपये १००१/- चे बक्षीस व प्रशस्तीपत्र देण्याचा प्रस्तावासमंजुरी देण्यांत येते वैधानीक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३४८:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, समाजातील सर्व लोकांना बरोबर घेऊन घरादाराचा त्याग करुन समाज सुधारणा करणारे थोर क्रांतीकारक महात्मा बसवेश्वर यांचा अश्र्वारुढ पुतळा आकाशवाणी चौकात बसविण्याचा प्रस्ताव विषय क्र.४९२ अन्वये दि. २०.०९.२००१ रोजी मा.सर्वसाधारण सभेने पारीत केला आहे.

परंतु आकाशवाणी चौकात जागे अभावी पुतळा उभारला जात नसल्याकारणाने टि.व्ही. सेंटर येथील स्वामी विवेकानंद उद्यानात उपलब्ध असलेल्या पश्चिम भागात मोकळया जागेवर पुतळा उभारणे व परिसराचे सुशोभिकरण करणे योग्य राहील. याबाबत अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध आहे.

करिता महात्मा बसवेश्वर यांचा अश्वारुढ पुतळा स्वामी विवेकानंद उद्यानात उभारण्याबाबतची व सुशोभिकरणा बाबतची प्रशासकीय कार्यवाही त्वरीत हाती घेण्यात यावी.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक:श्री.गादगे विरभद्र रामलींग,श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव,श्री.तुपे त्रिंबक गणपतराव, श्री.सुरेश इंगळे

अनुमोदक :श्री.काशीनाथ कोकाटे, श्री.संजय केनेकर, श्री.मोहन मेघावाले, श्रीमती रेखाताई जैस्वाल श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश,श्री.महेश माळवतकर,श्री.किशोर नागरे, श्री.हुशारसिंग चव्हाण, श्री.अनिल जैस्वाल, श्री.समीर राजुरकर,

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महात्मा बसवेश्वर यांचा अश्वारुढ पुतळा स्वामी विवेकानंद उद्यानात उपलब्ध असलेल्या पश्चिम भागात मोकळया जागेवर पुतळा उभारण्याबाबतची व सुशोभिकरण करणे तसेच समाज बांधव व नागरीकांच्या मागणीनुसार आकाशवाणी जवळील महात्मा बसवेश्वर चौक येथे उपलब्ध जागेवर महात्मा बसवेश्वर यांच्या नांवे स्मृतीस्तंभ उभारण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३४९:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, ऋतुजा शिरीष बक्षी, ११ वर्षाची मुलगी बुध्दीबळ स्पर्धा राज्य विजेती असून, तिने आजपर्यंत ७ वर्ष खालील, ९ वर्षाखालील, ११ वर्षाखालील, १३ वर्षा खालील अशी एकूण दहा राज्य विजेतेपद पटकाविले आहेत. तसेच पॉण्डेचेरी येथील १३ वर्षे वयोगटाच्या राष्ट्रीय बुध्दीबळ स्पर्धेत उपविजेतेपद मिळवुन रौप्य पदक पटकाविले आहे. त्यामुळे ऋतुजाची आशिया खंड युवा बुध्दीबळ स्पर्धासाठी भारतीय संघात निवड झाली आहे. सदरिल स्पर्धा फिलीपाईन्स येथे मे महिन्यात संपन्न होत आहे. सदरिल स्पर्धेस परदेशात जाण्यासाठी त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असलेल्या कारणाने त्यांना महानगरपालिकेतर्फे रु.२.०० लाख आर्थिक मदत करण्यात यावी.

सुचक : श्री.खेडकर सुशिल तुकाराम  अनुमोदक : श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ऋतुजा शिरीष बक्षी, ११ वर्षाची मुलगी बुध्दीबळ स्पर्धा राज्य विजेती असून, ऋतुजाची आशिया खंड युवा बुध्दीबळ स्पर्धासाठी भारतीय संघात निवड झाली आहे. सदरिल स्पर्धेस परदेशात जाण्यासाठी त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असलेल्या कारणाने त्यांना महानगरपालिकेतर्फे नियमाप्रमाणे रु.२.०० लाख आर्थिक मदत करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३५०</u>:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.८५, काबरानगर येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणे बाबत सदरिल भागामध्ये मध्यमवर्गीय व कामगार वर्गाची संख्या मोठया प्रमाणात असल्याने आरोग्याच्या दृष्टीने त्या ठिकाणी प्रा.आरोग्य केंद्र असणे अत्यंत आवश्यक आहे.

सुचक : श्री.खेडकर सुशिल तुकाराम  अनुमोदक : श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे वार्ड क्र.८५, काबरानगर येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर तेथील नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३५१:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.८५, इंदिरानगर भागामध्ये दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील कामे करण्याचा प्रस्ताव सादर करीत आहे. सदरील भागात वस्तींची संख्या ६० टक्के हून अधिक आहे.

०१. इंदिरानगर येथे रस्ता दुरुस्तीचे काम करणे रु. १५.०० लक्ष.

०२. इंदिरानगर येथे ड्रेनेज लाईनचे काम करणे रु. १५.०० लक्ष.

०३. इंदिरानगर येथे पिण्याचे पाईप लाईनचे काम करणे रु. १५.०० लक्ष.

सुचक : श्री.खेडकर सुशिल तुकाराम  अनुमोदक : श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे वार्ड क्र.८५, इंदिरानगर भागामध्ये दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील कामे करण्यास मंजूरी देण्यात येते..

०१. इंदिरानगर येथे रस्ता दुरुस्तीचे काम करणे रु. १५.०० लक्ष.

०२. इंदिरानगर येथे ड्रेनेज लाईनचे काम करणे रु. १५.०० लक्ष.

०३. इंदिरानगर येथे पिण्याचे पाईप लाईनचे काम करणे रु. १५.०० लक्ष.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद